स्वातंत्र्यावर अस्पृश्यतेचा पहिला कायदा १९५५ ला संमत झाला. त्यानंतरही अस्पृश्यतेच्या प्रमाणात घट न झाल्याने त्यात दुरुस्ती करून तो अधिक कडक बनवला गेला. पण या पूर्वीच आपल्या संस्थनात अस्पृश्यता निवारणाचे सलग चार जाहीरनामे प्रसिद्ध करणारे शाहू महाराज हे काळाच्या ५० वर्षे पुढे होते. हे वाचकांच्या लक्षात येईलच. फक्त अस्पृश्यता निवारणच नाही, तर काही मूलभूत अधिकार जसे सार्वजनिक स्थळांवर समानता, मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण, इत्यादी महाराजांनी करवीर वासियांना देऊ केले होते. जे इतरांना स्वातंत्र्योत्तर काळात संविधानाद्वारे मिळाले. शाहू महाराजांनी अनेक क्षेत्रात विविध समाजसुधारणा घडवून आणल्या परंतु अस्पृश्यता व जातीभेद निर्मुलणासाठी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

हे कार्य करण्यामागे त्यांच्या आयुष्यात घडलेले अनेक प्रसंग शाहु महाराजांना समाजाकडे मानवतावादी दृष्टिकोणातून पहायला लावतात. यातील प्रथम प्रसंग म्हणजे वेदोक्त प्रकरण! पंचगंगेच्या तिरावर स्नान करत असताना नारायण भटजी पुराणोक्त मंत्र विना स्नान करता म्हणत आहे, हे महाराजांचे स्नेही राजारामशास्त्री यांनी ओळखल्यानंतर विचारणा केली असता, नारायण भटजी कडून शुद्रांना वेदोक्त मंत्राची गरज नाही व पुराणोक्त मंत्रांना स्नानाची गरज नाही, हे उत्तर महाराजांच्या कानी विजासारखे पडले. क्षत्रीयकुलसंपन्न असून वेदोक्ताला मिळालेला नकार व त्याही पुढे जाऊन मनात घोंघावणारा एक प्रश्न की, छत्रपती असूनही माझ्या वाट्याला शुद्र म्हणून अवहेलना येत असणाऱ्या समाजात मुळात शुद्र व अस्पृश्यांच्या वाटेला काय मरण यातना येत असाव्यात? येथूनच महाराजांच्या मनात समाजसुधारकी विचारांची पायाभरणी झाली असावी. दुसरा प्रसंग असा, एका उच्चवर्णीयाच्या घरी जेवण्याच्या आमंत्रणावर गेले असता जेवणापूर्वी शिवाशिवी होईल म्हणून आचारीने मुद्पाकखाण्यात जाण्यास अडवल्याने त्यांचे मन कष्टी झाले. याची आठवण बॅ. केळवकरांना सांगताना शाहू महाराज म्हणतात. अशा विचारांच्या लोकांपेक्षा मला महारांच्या घरी जाऊन जेवण करावे वाटते. असे प्रागतिक विचार किंवा इच्छा बाळगणारे शिवछत्रपतींनंतर दुसरे व शेवटचे छत्रपती शाहू महाराज असावेत.

महाराजांनी सर्वप्रथम घेलेले क्रांतीकारी पाऊल म्हणजे १९०२ चा जाहीरनामा, यात मागासलेल्या वर्गातील लोकांच्या शिक्षणास उत्तेजण देण्यासाठी संस्थानातील नौकऱ्यांत त्यांना पन्नास टक्के आरक्षण देऊ केले. पूर्वी एकाच वर्गाकडे असणारे शिक्षणातील व शासकीय पदांतील मक्तेदारी नष्ट केल्यामुळे वर्तमानपत्रांतून या विरुद्ध टिकेचे झोड उठवली गेली. परंतू शाहू चरित्रकार धनंजय कीर यांनी म्हटल्याप्रमाणे, "ही मागासवर्गीयांसाठी नव्या युगाची घोषणा करणारा अग्रदुत होता".

नोकऱ्यांत आरक्षण दिले तरी मागासवर्गीय व अस्पृश्यांत शिक्षणाबद्दल अनास्था होती. त्यातही काही होतकरू विद्यार्थी शिक्षणात होणाऱ्या गैरसोयीमुळे मागे सरकत होते. याला पर्याय म्हणून शाहू महाराजांनी सर्वप्रथम 'व्हिक्टोरीया मराठा बोर्डींग' या पहिल्या वसतिगृहापासून ते अस्पृश्यांसाठी 'मिस क्लार्क हॉस्टेल' अश्या २० जातींसाठी स्वतंत्र वसतिगृह निर्माण केले. यात मराठा, जैन, लिंगायत, मुस्लीम, अस्पृश्य, सोनार, शिपी, पांचाळ, गौंड, सारस्वत, प्रभू, वैश्य, ढोर, चांभार, सुतार, नाभीक, कोष्टी अश्या जातींचा समावेश होता. या वसतिगृहाचे फलस्वरूप अनेकांनी इतिहासात नावे कोरली. जसे कृषितज्ञ पी.सी. पाटील, माजी उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती, माजी नागरी पुरवठा मंत्री रत्नाप्पा कुंभार, भारताचे शैक्षणिक सल्लागार जे. पी. नाईक, नगरपालिकेचे पहिले अस्पृश्य चेअरमन डी. एस. पवार, ही चळवळ पुढे चालू ठेवणारे कर्मवीर पद्मभुषण डॉ. भाऊराव पाटील याच वसतिगृहाचे विद्यार्थी होते. वसतिगृहाची चळवळ शाहू महाराजांनी सुरू केली. अनेक लोक प्रश्न उपस्थित करतात. जातीभेद निर्मूलन करताना महाराजांनी एकच वसतिगृह न करता जातवार निर्मिती का केली? हा प्रश्न सहाजिकच असून त्याचे उत्तरही तेवढेच सहाजिक आहे. हजारोंवर्ष भक्कम पायावर उभी असणारी ही जातीभेदाची इमारत, महाराज एका दिवसात नष्ट करू शकले नसते. तसे केल्यास त्याचा हा शिक्षणाचा क्रांतिकारी प्रयोगही अयशस्वी ठरला असता. त्यामुळे त्यांनी प्रथम शिक्षणावर भर दिला, एकदा शिक्षण मिळवून समाजाची वैचारिक पातळी उंचावल्यानंतर ही अस्पृश्यता व जातिव्यवस्था मुळात किती पोकळ व घृणास्पद आहे हे समाजाला समजून येईल, असा दूरदृष्टिकोण छत्रपती शाहू महाराजांचा होता.

हा फक्त विचार मांडून न थांबता इ.स.१९०२ मध्ये वसतिगृहाची चळवळ सुरू करून बराच काळ लोटल्यानंतर इ.स.१९१८-१९ मध्ये शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र वसतिगृहाचे एकत्रीकरण केले व अस्पृश्यांना सरकारी शाळेत प्रवेश देण्याचा आदेश काढून त्यांनी हा विचार प्रत्यक्ष कृतीत उतरवला.

शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या शिक्षणाकरिता इ.स.१९०७-०८ पर्यंत १६ शाळा काढल्या. इ.स.१९०७ मध्ये अस्पृश्यांतील मुलींसाठीही विशेष शाळा काढली. पुढे अस्पृश्यांत असणारी हालाकीची परिस्थिती पाहता त्यांनी आदेश काढून अस्पृश्यांसाठी शिक्षण मोफत व सक्तीचे केले. अस्पृश्यांतील वयवर्षे ७ ते १४ मधील मुलांच्या याद्या करून त्यांची शाळेत भरती केली. महाराजांच्या या आदेशाचे अंश पुढे 'भारतीय संविधानातील राज्यधोरणाच्या मार्गदर्शक तत्वांत' दिसतो. होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती सुरू केली. तसेच आर्य समाजातील स्वामींच्या मदतीने अस्पृश्य मुलांना धार्मिक व वेदांचे शिक्षण दिले. एका वर्गापूरते मर्यादित असणारे धार्मिक शिक्षण अस्पृश्यांपर्यंत पोहचवणारे शाहू महाराज इतिहासातील पहिले राजे ठरले.

सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी सलग चार जाहीरनामे काढले गेले. यात पहिला महसूल व न्याय खात्यासाठी, दुसरा आरोग्य खात्यासाठी, तिसरा विद्या खात्यासाठी होता. या जाहीरनाम्यातून सदरील शासकीय ठिकाणी आलेल्या व्यक्तीस अस्पृश्यांची व वेगवेगळेपणाची वागणूक न देता त्यांची न्यायाने सेवा करण्याचे आदेश देण्यात आले. तसे न होता गैरवर्तन आढळून आल्यास संबंधीत व्यक्तीस नौकरीतून वजा केले जाईल व पेन्शनही मिळणार नसल्याची सुचना देण्यात आली. हा आदेश मुळात वाचण्यासारख्या आहे. यातून महाराजांची अस्पृश्यांविषयीची तळमळ व आत्मीयता दिसून येते. चौथा जाहिरनामा म्हणजे संविधानाचे कलम १५ म्हणता येईल. ज्यात सार्वजनिक स्थळांवर जातिभेद व अस्पृश्यता न पाळण्याचा आदेश शाहू महाराजांनी दिला.

ज्या ठिकाणी महर्षी वि.रा.शिंदे काँग्रेसच्या व्यासपीठावर अस्पृश्यतेचा ठराव मांडण्यासाठी १० वर्ष प्रयत्न करीत होते व प्रत्येक वर्षी तो बारगळत होता, शेवटी इ.स.१९१७ साली ॲनी बेझंटच्या अध्यक्षतेत तो मंजूर झाला. अशा परिस्थितीत शाहू महाराज एक दोन नव्हे तर चार जाहीरणामे करवीरात प्रसिद्ध करत होते.

पूर्वी गावोगावी दोन माणाची पदे होती. पाटील व कुलकर्णी. ब्रिटीशांनी कुलकर्णी च्या जागी तलाठी हे पद निर्माण केले. छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानात तलाठी पदावर अस्पृश्यांची नियुक्ती केली. गावात पाटलासमोरही जाण्याची धास्ती खाणारा अस्पृश्य आज पाटलांच्या मांडीला मांडी लावून कारभार पाहू लागला. दया करा सरकार! म्हणणारा अस्पृश्य आज गावाचे रामराम स्वीकारू लागला. ही सामाजिक क्रांती छत्रपती शाहू महाराजांनी घडवून आणली होती.

महाराजांनी अस्पृश्यांसाठी भरीव कामे केली असली तरी त्यांनी या चळवळीचे पुढारीपण नको होते. अस्पृश्यांचा नेता अस्पृश्यच असावा, तोच त्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडू शकतो. असा त्यांचा विचार होता. परंतु असा नेता न मिळाल्याची खंत त्यांना होती. म्हणूणच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा अस्पृश्यांतील तरूण परदेशातून उच्चविद्या प्राप्त करून आल्याचे समजताच मोठ्या उत्सुकतेने त्यांनी त्यांची भेट घेतली. याच भेटीचे फलस्वरूप हजारोंवर्ष मुक्या समाजाला बोलते करण्यासाठी शाहू महाराजांच्या सहकार्याने बाबासाहेबांनी 'मुकनायक' सुरू केले. पुढे माणगावच्या परिषदेत बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्यांना त्यांचा नेता मिळाल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी जातिव्यवस्था नष्ट करावी लागेल व जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी तिन निर्बंध मोडून काढावे लागतील. रोटी बंदी, बेटी बंदी व्यवसाय बंदी! रोटीबंदी नष्ट करण्यासाठी शाहू महाराज प्रत्येक सभेनंतर अस्पृश्यांच्या हातचे अन्न घेऊन ही प्रथा धुडकावत होते. व्यवसायबंदीनुसार प्रत्येक जातिला आपला पिढीजात व्यवसाय करावा लागे. शाहू महाराजांनी इ.स.१९१८ मध्ये जाहीरनामा काढून बलुतेदार पद्धती खालसा केली. त्यामुळे बलुतेदारांना व्यवसायाची सक्ती राहीली नाही. याचे सुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे गंगाराम कांबळेंना छत्रपती शाहू महाराजांनी चहाचे हॉटेल टाकून दिले, ते स्वतः ते स्वतः हॉटेलवर चहा घेत व इतरांनाही तो घ्यायला लावत. पुढे गंगाराम कांबळे अस्पृश्यांचे मोठे नेते बनले व शाहू महाराज निवर्तल्यानंतर त्यांचे कोल्हापुरातील पहिले स्मारक फंड गोळा करून गंगाराम कांबळेंनी बांधले.

बेटीबंदी संदर्भात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा छत्रपती शाहू महाराजांनी संमत केला. त्यांनी याबाबतीत धाडसी कृत्य करायचे ठरवून आपल्या चुलत भगीनी चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या यशवंतराव होळकरांशी लावला. या पाश्वभूमीवर १०० मराठा-धनगर विवाह लावण्याचे नियोजन केले. त्यातील २५ विवाह शाहू महाराज हयात असताना झाले.

अशा कायद्यास देशातील परंपरावाद्यांचा विरोध होता. इ.स.१९१७ साली केंद्रीय कायदेमंडळात आंतरजातीय विवाहाचे फक्त विधेयक मांडल्याबद्दल विठ्ठलभाई पटेलांवर देशभरातील कर्मठ वृत्तपत्रांनी टिकास्त्र डागले होते. ही कठीण परिस्थिती असूनही छत्रपती शाहू महाराज करवीरात फक्त कायदा पास करून न थांबता प्रत्यक्ष प्रत्यक्ष आंतरजातिय विवाह घडवून आणत होते.

वरील कार्याचे आज एकविसाव्या शतकात आश्चर्य वाटत नसले तरी ते कार्य ज्या कार्य ज्या काळात घडवून आणले तो मोठा खडतर काळ होता. हजारों वर्षांपासून लादलेल्या जातिभेदाच्या जोखडापासून मुक्त होण्यास खुद्द अस्पृश्यच घाबरत होते. छत्रपती शाहू महाराज त्यांच्यासाठी कार्य करत असताना. आमच्या जवळ नका येऊ, आपला विटाळ होईल! असे केवीलवाणीपणे अस्पृश्यच त्यांना सांगायचे. सर्वप्रथम अस्पृश्यांचा उद्धार करण्याची ही परंपरा महात्मा ज्योतिबा फुलेंनी सुरू केली, छत्रपती शाहू महाराजांनी विधायक कामे करुन ती रुंदावली व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तिला योग्य दिशा देऊन शतकानोशतके बंधनात असणाऱ्या समाजाच्या येणाऱ्या संपूर्ण पिढ्यांचा उद्धार केला. ज्या काळी छ.शाहू महाराज हे क्रांतिकार्य करत होते तेव्हा समाजातील बहुतांश नेते सवर्णांतील होते. त्यामुळे छ.शाहू महाराजांवर आजन्म टिका होत राहीली, अडथळा निर्माण करण्याचे प्रयत्न होत राहीले. परंतु या सर्वांना दुर्लक्षीत करून अस्पृश्यता निर्मुलनाच्या ध्येयात खंबीर व बेदरकारपणे आयुष्याच्या शेवटपर्यंत अवीरत कार्य करण्याच्या समाजक्रांतीकारी धाडसी वृत्तीतच छत्रपती महाराजांचे शाहू पण दिसून येते!

संदर्भसूची

१. समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज - **डॉ. जयसिंगराव पवार**
२. राजर्षी शाहू महाराज - **धनंजय कीर**
३. श्री.छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र - **आ. बा. लठ्ठे**
४. छत्रपती राजर्षी शाहू महाराज - **तु. बा. नाईक**
५. लोकराजा शाहू महाराज व्यक्तीत्त्व आणि विचार - **धनंजय कीर**
६. समाज क्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज - **डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर**

अस्पृश्याता निवारणात राजर्षी शाहू महाराजांचे योगदान

सूर्यवंशी यशोदा ज्ञानेश्वर
बी.ए. प्रथम वर्ष

जातीभेद, बहुजनांना शिक्षण, स्त्रीमुक्तीसाठी कायदे, अस्पृश्यता निवारण अशा अनेक सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराज यांचे कार्य अलौकिक आहे.

सामाजिक सुधारणाबरोबरच त्यांनी कला, साहित्य, शेती सुधारणा, जलप्रकल्प उभाराणी असा विविध कार्याची कामगिरी बजावली. त्याचप्रमाणे लोकनेते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी अस्पृश्यता निवारणात खूप मोठे योगदान दिले आहे.

शिक्षण प्रसारात योगदानः

शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजातील व्यक्तींना योग्य ते शिक्षण मिळावे यासाठी विविध धोरण आखून त्यांनी दलित समाजाला शिक्षण प्राप्त करून दिले. त्यामध्ये त्यांनी (शाहू महाराजांनी) आपल्या संस्थानातील सर्वच मागासवर्गीय जातींचा उद्धार शिक्षणाच्या साधनाने करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले होते, आणि त्या अनुसार निरनिराळ्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे कोल्हापुरात स्थापन होऊ लागली होती. यामध्ये शाहू महाराजांचे पहिले महत्त्वाचे काम पार पडले होते.

इ.स.१९०८ मध्येच राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या अनेक सहकारी मंडळांनी मिळून अस्पृश्यांचे वसतिगृहे सुरू केले होते. यामध्ये भास्करराव जाधव, शिंदे, बागल या मंडळींना पुढे करून या कार्याची सुरुवात केली. त्यासाठी महाराजांनी अस्पृश्य मानलेल्या जातीत विद्याप्रसारक मंडळी नावाची संस्थाही स्थापन केली होती. भास्करराव हे त्यांचे प्रमुख होते.

या वसतिगृहात अस्पृश्यांची मुले मिळत नव्हते कारण त्या अस्पृश्य समाजात शिक्षणाची इतकी प्रचंड अनास्था होती की, त्यांच्या पोहऱ्यात पुरेसे पाणी येणे मुश्किल होते. अशा या परिस्थितीत राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहास मुले मिळवण्यापासून ते त्यांच्या सर्व शैक्षणिक खर्च पूर्ण करून या मुलांचा शैक्षणिक दर्जा स्पृश्य शाळांतील मुलांच्या दर्जाइतका आणण्यापर्यंत असे सर्व प्रकारचे प्रयत्न स्वतः शाहू महाराज व त्यांची मंडळी पार पाडायचे. महाराजांनी या सर्व अडचणीवर मात करण्याचे प्रयत्न सुरू केले होते व या त्यांच्या प्रयत्नाला यशही प्राप्त झाले.

त्या काळी सर्वत्रच स्पृश्यांच्या व अस्पृश्यांच्या शाळा वेगवेगळ्या होत्या. स्पृश्यांस्पृश्य भावना इतकी तीव्र होती, स्पृश्य विद्यार्थी अस्पृश्य विद्यार्थ्यांबरोबर बसणेही शक्य नव्हते. कायद्याने ही भावना नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यास त्यावेळी परिस्थिती अनुकूल नव्हती, अशी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्यासाठी समाजप्रबोधन करण्याचे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी ठरविले व त्यांनी शिक्षणासंबंधीचे समाजप्रबोधन करण्यास सुरुवात केली.

अशा प्राप्त परिस्थितीमध्ये त्यांनी अस्पृश्यांमध्ये शिक्षणासाठी जागृती घडवून आणली व त्यांच्या शाळेच्या संस्थेत वाढ केली, एवढेच नव्हे तर त्यांनी या लोकांमध्ये शिकण्याची इच्छा प्रवृत्ती केली. या त्यांच्या समाजप्रबोधनामुळे अनेक बदल घडून आले. त्यामध्ये अनेक बाबींचा समावेश आहे.

समाज प्रबोधनामुळे घडून आलेले बदलः

राज्य रोहणाच्या वेळी (इ.स.१८९४) संस्थानात अस्पृश्यांसाठी केवळ ५ शाळा होत्या व त्यामधील विद्यार्थ्यांची संख्या १६८ होती. इ.स.१९०७-०८ साली अस्पृश्य शाळांची संख्या १६ व विद्यार्थ्यांची संख्या ४१६ झाली. महाराजांच्या या अथक प्रयत्नांमुळे शाळांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली आणि विद्यार्थी संख्येत वाढही होत गेली. अवघ्या ४ वर्षात १९१२ साली अस्पृश्य शाळांची संख्या २७ व विद्यार्थी संख्या ६३६ झाली होती. अस्पृश्यांमध्ये महार, मांग, चांभार, ढोर या प्रमुख जाती होत्या. त्यांची संस्थानातील लोकसंख्या ही शतकाच्या प्रारंभी एक लाखाहून अधिक होती. अशा लोकसंख्येत हे शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण वाटत असले तरी त्या जातीचा पूर्व इतिहास लक्षात घेता शिक्षणाला पूर्णपणे वंचित राहिलेल्या या समाजाची प्रगती कमी किंवा संथ असली तरी लक्षणीय होती व त्याचे सर्व श्रेय छ.शाहू महाराजांच्या अस्पृश्यांविषयीच्या उदार शैक्षणिक धोरणास होते.

अस्पृश्यता-निवारणाचे जाहिरनामेः

शाहू महाराजांनी अखील मानवजातीय कलंक असणाऱ्या अस्पृश्यतेच्या रुढीने निर्दालन करण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत. आपल्या संस्थानातून अस्पृश्यतेचे उच्चारण करण्याच्या उद्देशाने महाराजांनी इ.स.१९९१ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेच दोन जाहिरनामे मंजूर केली. त्यातील पहिला महसूल, न्याय, इ. खात्यांसंबंधी होता.

त्यामध्ये कोल्हापूर इलाक्यातील रेव्हिन्यु, ज्युडिशियल आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी स्वीकारतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे व तसेच कोणाही इसमाला जनावराप्रमाणे न वागवता मनुष्यासारखे वागवले जाईल, असे शाहू महाराजांनी सांगितले.

असाच एक जाहिरनामा त्याच दिवशी संस्थानाच्या आरोग्य विभागासाठी मंजूर केला होता. त्यानंतर १५ दिवसांनी विद्या खात्यातील अस्पृश्यता नष्ट करणारा जाहिरनामा मंजूर झाला.

स्त्रीशिक्षणाला प्रोत्साहनः

स्त्रीमुक्तीची सुरुवातही छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या घरापासूनच केली. महाराजांनी आपल्या सुनबाई 'इंदुमती राणीसाहेब' यांना अकाली वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांनी शिक्षण दिले. त्यांनी स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देऊन राजाराम कॉलेजमध्ये मुर्लीना फी माफी दिली. स्त्रियांना शिक्षण दिले. कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. धर्माच्या नावाखाली मुले-मुली राहण्याची अघोरी प्रथा बंद केली. स्त्री पुनर्विवाह कायदा केला.

संदर्भ ग्रंथ :

राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा स्नेहबंध व त्यांचे जलधोरण

अक्षय कांबळे
बी.ए. द्वितीय वर्ष

इ.स. १९९८ च्या सुमारास डॉ. बाबासाहेबचे नाव छत्रपती शाहू महाराजांच्या कानावर आले असावे. बाबासाहेबांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठाच्या एम.ए. पी.एच.डी. आणि इंग्लडमधील लंडन विद्यापीठाच्या एम.एस्सी. व बार-ॲट-लॉ या पदव्या संपादन केल्या होत्या.

महार समाजातील एक तरूण परदेशातील इतक्या पदव्या प्राप्त करून मायदेशी आल्याचे समजताच, महाराजांनी त्याचा विलक्षण आनंद झाला एवढ्यावरच न थांबता त्यांनी आपणहून मुंबई मुक्कामी डॉ. बाबासाहेबांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली. या भेटीपासून या दोघांत स्नेहाचे व सहकार्याचे संबंध सुरू झाले.

बाबासाहेबांनी बहिष्कृत समाजात जागृती करण्यासाठी व त्यांच्यावरील अन्यायास वाचा फोडण्यासाठी 'मुकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. बाबासाहेबांच्या या उपक्रमामागे शाहू महाराजांनी आपले अर्थसहाय्य उभे केले होते. 'मुकनायक' सुरुवातीपासून मदत करणे ही त्यांची एक स्वाभाविक प्रतिक्रिया होती. अशा प्रकारचे सहकार्य महाराजांकडून बाबासाहेबांना मिळत गेले.

माणगाव परिषद आणि बाबासाहेबांचा उदयः

इ.स. १९२० साली राजर्षी शाहू महाराजांनी दलित समाजाच्या उत्थानासाठी 'अस्पृश्यता मानगाव परिषद' भरविली. या परिषदेसाठी आपला अमूल्य वेळ काढून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उपस्थित राहणार होते. बाबासाहेब या परिषदेचे अध्यक्ष होते. बाबासाहेबांच्या रूपाने अस्पृश्य समाजास एक उमदे नेतृत्व मिळत आहे याचा महाराजांना मोठा आनंद झाला.

महाराजानी आपला आनंद व्यक्त करताना म्हणाले होते की, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला, याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, एक दिवस डॉ. बाबासाहेब हे तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत.

इतकेच नव्हे, तर अशी एक वेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानाचे पुढारी होतील. माझी मनोदेवता मला असे सांगते. महाराजांनी आपल्या दूरदृष्टीने बाबासाहेबांविषयी केलेले मत किती अचूक होते, हे इतिहासाने सिद्ध केले आहे. याच परिषदेत बाबासाहेबांच्या विद्वत्तेचा महाराजांनी मोठा गौरव केला. ते म्हणाले , आज त्यांना पंडीत ही पदवी देण्यास तरी काय हरकत आहे? विद्वानांत ते एक भूषणच आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या पुढाकाराने परिषदने, शाहू छत्रपतींनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कार्य केल्याबद्दल अभिनंदन करून त्यांचा वाढदिवस प्रत्येक बहुजन व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा असा खास ठराव या परिषदेने मंजूर केला.

कोल्हापूरच्या या भेटीत महाराजांनी बाबासाहेबांना मोठ्या सन्मानाने वागविले व शेवटी निरोप देताना, कोल्हापूरी जरीपटक्याचा प्रेमाचा आहेर ही केला. हा आहेर स्वीकारताना बाबासाहेबांचे डोळे पाणावले आणि ते उद्‌गारले, 'छत्रपतीनी मानाचा जरीपटका माझ्या मस्तकी चढविला, त्याचा मी सदैव मान राखीन.' आयुष्यभर दलितोद्धाराचेच कार्य करून बाबासाहेबांनी छत्रपतीच्या जरीपटक्याचा मान राखला असाच त्यांनतरचा इतिहास सांगतो.

आर्थिक टंचाई काही प्रमाणात दूर होईल या हेतूने व जे ज्ञान त्यांच्याजवळ आहे जे विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे म्हणून बाबासाहेब मुंबईच्या सिडन हॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी करीत होते. पण त्यांचे लक्ष आपल्या अपुऱ्या राहिलेल्या शिक्षणाकडे लागून राहिले होते. ते करण्यासाठी ठराविक मुदतीतच त्यांनी जुलै १९२० मध्ये लंडनला गेले. बाबासाहेबांच्या उच्च शिक्षणासाठी महाराजांनी आर्थिक मदत केलीच पण बाबासाहेबांची स्वतः जाऊन त्यांची विचारपूस केली.

एवढेच नव्हे तर, 'रमाबाई ही माझी धाकटी बहिण; तुम्ही लंडनहून परत येईपर्यंत मी तिला माहेरी कोल्हापूरी घेऊन जातो'. असे अंतरीच्या प्रेमाचे बोलणे केले. महाराजांच्या या उद्‌गाराने बाबासाहेब गहिवरून गेले. असा अंतरिक जिव्हाळा क्वचितच अनुभवण्यास मिळतो.

सामाहिजक लोकशाहीचे आधारस्तंभः

इंग्लंडमध्ये राहत असलेले बाबासाहेब महाराजांशी पत्रव्यवहार करत होते. ४ सप्टेंबर १९२१ या दिवशी लिहिलेल्या पत्रात इंग्लंडमधील चलनाचे भाव घसरल्यामुळे आपणापुढे आर्थिक अडचण निर्माण झाली असून, ही निवारण्यासाठी २०० पौंडाची रक्कम देण्याची बाबासाहेबांनी विनंती केली होती. याच पत्राच्या शेवटी, ाबासाहेबांनी लिहिले होते. महाराज आपली प्रकृती ठीक असेल. अशी मला आशा आहे. कारण, हिंदुस्थानात प्रगती करत असलेल्या सामाजिक लोकशाहीच्या महान चळवळीचे आपण एक आधारस्तंभ आहात.

लोकमान्य आंबेडकरः

महाराजांनी बाबासाहेबांना लिहिलेल्या एका पत्राचा मायना मोठा वैशिष्टपूर्ण आहे. त्यामध्ये महाराजांनी बाबासाहेबांना 'लोकमान्य आंबेडकर' असे संबोधिले आहे. ही पदवी फक्त टिळकांना लावली जात होती. येथे ती बाबासाहेबांना लावून ते हिंदुस्थानातील तमाम मागासवर्गीयांचे लोकमान्य नेते होणार आहेत, असे शाहू महाराजांना म्हणायचे होते.

राजर्षी शाहू महाराजांचे जल धोरणः

शिकार ही राजर्षी शाहू महाराजांचा आवडता छंद जरी असला तरी, या छंदातून दऱ्याखोऱ्यात रानामाळावर वस्ती करून राहिलेल्या गरीब जनतेशी प्रत्यक्ष संपर्क साधणे व त्यांच्या अडी-अडचणी कोणत्या आहेत हे समजून घेणे हाही एक प्रमुख उद्देश असे.

घोड्यावर आपली पोलादी मांडी घालून महाराज ज्या वेळी शिकारीसाठी भटकंती करीत, त्या वेळी वाटेत भेटणाऱ्या गरीब

शेतकऱ्यांशी, धनगरांशी, फासेपारध्यांशी अथवा इतरांशी सामाजिक, आर्थिक, कृषिक्षेत्राची माहिती करून घेत. आपण छत्रपती आहोत हे महाराजांना कधीच वाटत नव्हते.

साधे राहणे, मिळेल ते अन्न, समोरच्या व्यक्तीप्रमाणे भाषेचा वापर यांमुळे जनता देखील महाराजांच्या स्वभावात, वागण्यात वेगळेपणा पाहत नव्हती. त्यामुळे जनता त्यांच्याशी दिलखुलास बोलत असे. अशा चर्चेतून महाराजांना कळून आले की, आपल्या राज्याचे शेतीचे क्षेत्रफळ जरी भरपूर असले तरी, या शेतीला पाण्याचा पुरवठा होणे गरजेचे आहे. यासाठी काय केले पाहिजे? हा प्रश्न नेहमीच त्यांना सतावीत होता.

दाजीपूरच्या जंगलात शिकारीसाठी नेहमी जा-ये करत असल्यामुळे या भागाची पूर्ण माहिती महाराजांना होतीच. दाजीपूरजवळ भोगावती नदीचा उगम होतो. ही नदी डोंगराळ भागातून कोल्हापूरकडे येते. या नदीला कोल्हापूराच्या थोडे आलिकडे तुलसी, कुंभी व कासारी या नद्या मिळतात.

अशा नद्यावर जर धरण बांधले तर या पाण्याचा उपयोग शेती क्षेत्रासाठी मोठ्या प्रमाणावर होईल हे महाराजांना कळाले. शेतकऱ्यांचे, गोरगरीबांचे आश्रू जर कायमचे पूसायचे असतील तर 'धरण' हाच एक उपाय आहे. या उपायातून सामर्थ्यवान शरीरात बलवान बुद्धीचे पण दर्शन घडते.

कोल्हापूर-गैबी खिंड आणि निपाणी-फोंड घाट या रस्त्याच्या बाजूने भोगावती जी पुढे धावते केले. धरणाचा आराखडा महाराजांनी आपल्या देखरेखी खाली तयार करून घेतला. धरणाची लांबी २६०० फुट, उंची ११० फुट धरण्यात येऊन, धरणाच्या ओलिताखालची २० हजारांवर एकर जमीन येईल असे गृहीत धरण्यात आले.

तसेच धरण उभारण्याचा खर्च अंदाजे ३० लाख रु. गृहित धरण्यात आला. महाराजांनी निवडलेली जागेची ख्यातनाम तीन स्थापत्य विशारद आणि एक भूगर्भशास्त्राचे तज्ज्ञ प्राध्यापक यांनी त्या जागेची काळजीपूर्वक करून तपासणी व अभ्यास करून सर्वोत्कृष्ट असल्याची माहिती दिली. पण अश्चर्य म्हणजे महाराजांनी ही जागा केवळ एक दिवसात निवडली. त्याचे सार्थ उत्तर काळाने दिलेले आहेच.

महाराजांनी ज्या जागेची निवड केली, ती जागा कोल्हापूर पासून ३१ मैल अंतरावर असून ही जागा. फेजिवड गावाच्या हद्दीत येते. या धरणाचे पाणलोट क्षेत्र ३८.२२४ चौ मैलाचे ग्रहीत धरण्यात आले. संपूर्ण धरण दगडाने बांधण्याचे निश्चित करण्यात आले. हे बांधकाम चुन्यात करायचे असे ठरले चुन्याशिवाय त्या वेळी दुसरा पर्याय ही उपलब्ध नव्हता.

धरणामुळे होणाऱ्या जलाशयाला महाराणी लक्ष्मीबाई यांच्या शुभहस्ते इ.स.१९०९ साली पूजन होऊन काम वेगाने सुरू झाले. महाराजांचे बंधु बापूसाहेब महाराज स्वतः उपस्थित राहून धरण बांधकामावर राबणाऱ्या दोन हजार कामगारांच्या नवचैतन्य निर्माण करीत होते. एका ध्येयात बांधलेले कामगार कामात कसूर न करता प्रयत्नांची शिकस्त करीत होते.

आजच्या एखाद्या म्युनिसिपालिटीच्या कामगारांप्रमाणे वेळेचा व्यर्थ अपव्यय करून दिवस ढकलित एक तारखेवर नजर ठेवणारे ते कामगार नव्हते, तर आपल्या लाडक्या राजर्षींचे स्वप्न साकार करण्यासाठी श्रम आणि जिद्द पणाला लावून काम करीत होते.

महाराज धरणाला भेट देण्यासाठी ज्या ज्या वेळी येत होते, त्या-त्या वेळी घामाने चिंब झालेले कामगार महाराजांकडू डोळ भरून पाहता. नंतर लेगेच नव्या उमेदिने, नव्या प्रेरणेने कामास लागत. कामगारांच्यातील हा बदल इंजि. गुप्ते व सुपरवायजर मिन्नर यांच्या ध्यानी येऊन ते विचार करीत महाराजांच्या दर्शनात अशी कोणीती जादू लपलेली आहे की, जिच्या दर्शनाने दिवसभर काम करून थकलेले कामगार परत नव्या उमेदेने कामास लागतात.

शाहू महाराज कामगार काम करीत असताना स्वतः त्यांच्याजवळ जात कित्येकांची विचारपूस करून त्यांची काही अडचणी असल्या तर ते सोडवीत, कांहींच्या पाठीवर थाप मारुन प्रोत्साहन देत. त्यांच्या मुलांसाठी खाऊ आणलेला देत. महाराजांविषयी मुळातच रयतेला अपार श्रद्धा होती त्यात त्याच्या अशा वागणुकीमुळे तर कामगार वेडेपिसे होते.

प्रेमाने पाषाणाची फुले होतात. काट्यांचे मुकुट होतात, मरणाचे जीवन होते. हे तर कामगार महाराजांच्या एका शाळासाठी वाटेल ते करावयास तयार होते.

इ.स.१९१६-१७ साल उजाडलं, बांधकाम तेरा लाख शहाऐंशी हजार अठ्ठावीस घनफुट झाले. बांधकामावर आतापर्यंत तेरा लाख छत्तीस हजार, एकशे तीस रुपये खर्च झाले. इतक्यात महायुद्धाच्या अग्नीने जगाला घेरले. महागाईने तर आक्राळ-विक्राळ रूप धारण केले. धरणाचे बांधकाम तात्पुरते थांबविण्यात आले. पुढे लवकरच अचानक राजर्षींचे निधन झाले व राजर्षींचे पुत्र राजाराम छत्रपती यांनी धरण बांधकामाची योजना पूर्ण केली. राजर्षींचे स्वप्न सफल झाले!



राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक, राजकीय, कृषि न्यायाचे धोरण

माने ऋतूजा विष्णू
बी.ए. द्वितीय वर्ष

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराज पुरोगामी महाराष्ट्राच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे समाज क्रांतीकारक राजे म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या संस्थानात विविध समाजोपयोगी आर्थिक कार्ये केली. आपल्या अल्प काळात त्यांनी विविध आर्थिक सुधारणा केल्या. समाजातल्या प्रत्येक घटकासाठी त्यांनी कार्यो केले. समाजास शिक्षण मिळावे यासाठी प्रयत्न केले. शिक्षण घेणाऱ्या बहुजन वर्गासाठी आरक्षणाद्वारे नोकरीची संधी उपलब्ध करुन दिली.

शाहू महाराज जीवन परिचय व त्यांच्या काळातील स्थिती :

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात झाला. घाटगे घराणे हे छत्रपतीच्या संस्थानांतर्गत जहागीरदार होते. त्यांचे वडील आबासाहेब घाटगे हे कर्तबगार होते. शाहू महाराजांना छत्रपतीच्या गादीवर दत्तक वारसा प्रदान केला.

शाहू महाराजांच्या काळात समाजात आचार विचार सनातनी होते. सामाजिक समतेचे कार्य करणे म्हणजे खूपच अवघड कार्ये होते. समाजात स्त्रियांना, अस्पृश्यांना खूप वाईट वागणूक मिळत होती. या काळात जातीव्यवस्थेचे स्त्रोत मोठ्या प्रमाणात माजले होते. या काळातील सामाजिक आणि राजकीय परिस्थिती प्रतिकूल होती. शिक्षणक्षेत्रात आणि सार्वजनिक क्षेत्रातील नोकऱ्यात ब्राह्मणवर्गाची मक्तेदारीच होती. त्यामुळे मागासलेल्या व अस्पृश्य लोकांना समाजात न्याय मिळत नसे. अशा प्रतिकूल परिस्थितीतून राजर्षी शाहू महाराजांनी समाजात अनेक सामाजिक कार्य केले.

राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक न्यायाचे धोरण :

भारतीय स्वातंत्र्यपूर्व काळातील वर्षानुवर्ष चालत आलेल्या सामाजिक कनिष्ठ प्रथेच्या विरोधात खंबीरपणे विरोध करीत आपल्या राजकीय सत्तेच्या आधारावर सर्वसामान्यांना समाज विकासात योगदान देणाऱ्या राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक विचार यांचे अध्ययन आवश्यक आहे ते खालीलप्रमाणेः

मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण :

भारतात शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी ब्रिटीशांनी प्रयत्न केले. सन १८५४ साली भारतीयांनी शिक्षण देण्याची घोषित करून भारतात ठिकठिकाणी शाळा स्थापन केल्या. शासन, खाजगी संस्थांनी शाळा काढल्या. भारतात मिशनऱ्यांच्या शाळा ही अस्तित्वात होत्याच परंतू त्यात अस्पृश्य समाजातील मुलांना प्रवेश दिला जात नव्हता यासंदर्भात शाहू महाराज म्हणतात. खालच्या वर्गाच्या बुद्धीवर व ज्ञानावर हे जे जड व जुलमी जू लादले होते ते जूगारून देण्याची सक्ती बहूजन समाजाच्या अंगी येण्यास प्राथमिक शिक्षण जरुरी आहे. म्हणून त्यांनी बहुसंख्य अज्ञानांचा ज्ञानाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्राथमिक शिक्षणावर भर दिला.

उच्च व व्यवसाय शिक्षणातील योगदान :

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची हिंदूस्थानाला अत्यंत गरज आहे हे ओळखून त्याची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी कायदा केला. शाहू महाराज दूरदृष्टीचे राजे होते. भविष्याचा अचूक वेध घेऊन संस्थानातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी व्यवसायिक शिक्षणाला महत्त्व दिले. त्यांनी कोल्हापूर संस्थानामाध्ये जयसिंगराव घाटगे टेक्नीकल इंस्टिट्युट , ओब्रायन टेक्निकल स्कूल, पाटील शाळा तलाठी स्कूल इ. संस्थेमधून तांत्रिक शिक्षण देण्याची व्यवस्था केली.

सामाजिक समतेच्याससाठी आरक्षण विषयक कार्ये :

सर्वसामान्य लोकांचे जीवन ज्ञानाने उजळून निघावे, त्यांना न्याय मिळावे यासाठी शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील प्रशासनिक सेवेत ५० टक्के जागा राखीव करण्याचा ऐतिहासिक जाहिरनामा प्रसिद्ध केला. यामूळे समाजातील गोरगरिबांना शासकीय नोकऱ्या मिळू लागल्या.

सामाजिक समेच्या दृष्टीने सुधारणा :

तात्कालीन समाजव्यवस्थेत विषमता मोठ्या प्रमाणात पसरली होती. सामाजिक विषयमतेमूळे भेदभाव उचनिचता समाजात मोठ्या प्रमाणात होती त्यातून सामाजिक समता निर्माण करणे कठीण कार्य होते. त्यांनी ठिकठिकाणी सामाजिक विषमतेविरुद्ध परिषदा आयोजित केल्या, अनेक ठिकाणी विषमतेचे बंधन तोडून टाकण्यासाठी व्याख्याने लिहिली व अशाप्रकारे अस्पृश्योद्धाराचे कार्य त्यांनी केले.

शेतकरी वर्गासाठी समान न्यायाची कार्ये:

राजर्षी शाहू महाराज यांनी राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर शेतकरी वर्गासाठी सूधारणा करण्याचे धोरण हाती घेतले. कोल्हापूर संस्थानात रयतेच्या सर्वांगीन विकासासाठी विविध सुधारणा केल्या आपल्या संस्थानात शेती, उद्योगधंदे, व्यापार इ. बाबतीत भरभराट व्हावी या उद्देशाने अनेक उपाययोजना केल्या, त्यांनी शेतकरी वर्गासाठी सिंचनाची सोय करून दिली.

महिला विषयक सूधारणा:

राजर्षी शाहू महाराजांनी महिलांच्या विकासासाठी त्यांना सामाजिक विषयमतेतून बाहेर काढण्यासाठी बहुमोल कार्य केले. स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. त्यांनी आपले स्नुषा, राणी इंदूमती देवी हिला शिक्षण देण्यासाठी व्यवस्था केली. समाजातील अनिष्ठ रुढींचे उच्चाटन करण्यासाठी इ.स. १९१७ मध्ये पूनर्विवाहाचा कायदा पास केला. विधवा विवाहास कायदेशीर मान्यता दिली. अशाप्रकारे महिलांसाठी समाजात सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी हक्क मिळवून दिले.

धार्मिक समतेच्या दृष्टीने सूधारणा:

राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यकाळात धार्मिक स्तोम माजले होते. स्पृश्य, अस्पृश्य, भेदाभेद यांनी समाज ग्रस्त झाला होता. याविरुद्ध त्यांनी लढा उभारला समतेच्या आड येणाऱ्या अशा बाबी विरुद्ध त्यांनी प्रखर विचार व्यक्त केले. त्यांच्यावर उद्भवलेल्या वेदोक्त प्रकरणाच्या माध्यमातून त्यांनी राज्यातील विषमता: अनुभवली. त्यातून बहून

वर्गाच्या उद्धारासाठी त्यांनी कार्य केले.

शैक्षणिक कार्ये:

बहुजन वर्गाच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण हे अज्ञान आहे, हे राजर्षी शाहू महाराजांनी जानले होते. त्यातूनच त्यांनी बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे धोरण आखले. समाजातील समानता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून मागासलेल्या वर्गास शिक्षणाची संधी उपलबध करून देण्याचे मत मांडले.

वसतीगृह स्थापना :

शाहू महाराजांनी इ.स.१८९६ मध्ये सर्व जाती जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह सुरू केले. परंतू त्यात केवळ ब्राह्मणच प्रवेश घेत असत. परिणामी महाराजांनी प्रत्येक जातीतील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केले. त्यामध्ये मराठा, बोर्डींग, जैन बोर्डींग, मिस क्लार्क, होस्टेल, सारस्वत बोर्डिंग कायस्थ प्रभू बोर्डिंग, देवांग बोर्डिंग, सुतार बोर्डिंग इ. वसतिगृहांचा समावेश होता.

भटक्या व विमुक्तांचे संरक्षण :

माणून हा इथून-तिथून पण सारखाच पण परिस्थिती त्याला गुन्हेगार बनवते. यात बदल करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

अस्पृश्यता निवारण :

अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक होता. ही रुढी अमानुष व क्रुर होती. या पाश्वभूमीवर शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात या दुष्ट रुढीस दूर करण्यासाठी कायद्याद्वारे निर्णय केला, त्याआधारे जाहीरनामे मंजूर केले.

१. अस्पृश्यांना प्रेमाने व समतेने वागवले पाहिजे.

२. अस्पृश्यांचा कोणीही विटाळ पाळायचा नाही.

वरीलप्रमाणे त्यांनी जाहीरनामे प्रसिद्ध करून अस्पृश्यता निवारणात त्यांनी कार्य केले.

शाहू महाराजांचे राजकीय धोरण :

महाराष्ट्रामध्ये अनेक राजे महाराजे होऊन गेले. यामध्ये कोल्हापूर संस्थनिकांचे राजे राजर्षी शाहू महाराज हे उल्लेखनीय आहेत. समाजातील सवर्ण-दलित हा भेद संपुष्टात आणण्याकरीता दलित वर्गाला नोकरी, शिक्षण, व्यवसाय इत्यादीमध्ये आरक्षण दिले. बहुजनामध्ये केल्या. स्त्रियांचा सर्वांगीण विकास घडवून यावा म्हणून त्यांना व्यक्ती स्वातंत्र्य, शैक्षणिक सुविधा, नौकरीमध्ये आरक्षण दिले. अनिष्ठ प्रथा परंपरा कायमस्वरुपी बंद करण्यासाठी कायद्याची तरतूद केली. राजर्षी शाहू महाराजांनी समाज विकासाकरिता केलेल्या सुविधा आणि कायदे यांच्या माध्यमातून राष्ट्रबांधणीला योग्य दिशा मिळाली. त्यांच्या कृतीशील कार्यातून समाज एकसंघ निर्माण झाला. त्यामूळे राष्ट्रीय एकात्मतेची संकल्पना विकसित झाली.

बहूजनांचा उद्धार :

शाहू महाराजांनी सवर्ण-दलित हा भेद संपूष्टात आणण्याकरिता दलितांना व्यक्ती स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य दिले. तसेच दलितांना सार्वजनिक ठिकाणी हॉटेल, रसवंतीगृह, उपहारगृह, फळभाज्या विक्री करण्याकरिता आर्थिक मदत केली. राजदरबारी दलितांना नोकरी दिली. त्याबरोबर प्रशासनामध्ये बहुजन वर्गाला ५० टक्के आरक्षण दिले.

स्त्री-पुरुष समानता:

शाहू महाराजांनी स्त्री-पुरुष, मुलगा-मुलगी असा कोणताही भेद न बाळगता ते म्हणतात स्त्री-पुरुष हे दोन्ही एकाच रथाची दोन चाके आहेत. त्या दोन्हीला समान स्वरूपाचे अस्तित्व आहे. त्यामूळे मुलगा-मुलगी हे समान आहेत मुलांप्रमाणेच मुलींनाही स्वातंत्र्य आहे अशी विचारप्रणाली राजर्षी शाहू महाराजांनी मांडली.

राजदरबार व प्रशासक:

शाहू महाराजांनी आपल्या राजदरबारात अनेक महार, मांग, चांभार या बहुजन वर्गातील व्यक्तींना नोकरी दिली. तर काही बहुजनांना राजदरबारातील उच्च पदावर नेमले. त्याच बरोबर आपल्या संस्थानातील प्रशासकीय कार्यालयात बहुजन वर्गाकरिता ५० टक्के राखीव जागा देण्यात आल्या.

५० टक्के आरक्षणाचा अभूतपूर्व जाहीरनामा १९०२:

राजर्षी शाहू महाराजांचा मूख्य उद्देश प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर होता. राजर्षी शाहू महाराजांनी ५० टक्के जागा खालच्या जातीतील वर्गातील लोकांना आरक्षित करण्याचा निर्णय घेतला हा निर्णय क्रांतीकारक होता.

सर्वांना मताधिकार :

कोल्हापूर संस्थानात एकच नगरपालिका होती त्या काळात फक्त सुशिक्षित ब्राह्मणांनाच मतदानाचा अधिकार होता. शाहू महाराजांनी १९०४ साली कोल्हापूर नगरपालिका बरखास्त केले व राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्येक प्रौढ महिला पुरुषांना मतदानाचा हक्क दिला.

आरक्षण धोरणाचे जनक:

छत्रपती शाहू महाराज विचाराचे पाईक असलयामुळे त्यांना कोल्हापूर संस्थानात सामाजिक समता प्रस्थापित करावयाची होती. वर्षानुवर्षापासून प्रचलित असलेली अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सर्वांना समान संधी प्राप्त होणे गरजेचे आहे, हे लक्षात घेऊन त्यांनी ५० टक्के आरक्षण दिले.

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण :

आधूनिक काळात लोकशाही शासनाचे यशापयश मोजण्याचे साधन म्हणजे त्यांच्या सार्वजनिक धोरणाचे मूल्यमापन करणे होय. आज शिक्षण सर्वांना हवे आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षण हे गूणवत्तापूर्ण पण ते सर्वांना मिळत नव्हते. अशा परिस्थितीत महात्मा फुले यांनी अंगीकारलेला सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकी-करणाचा वसा छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी स्वीकारला. शिक्षण प्रसाराच्या ध्यासाने प्रेरित होवून त्यावेळच्या समाजाची शैक्षणिक गरज ओळखून शाहू महाराजांनी आपले शैक्षणिक धोरण आखले. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत लोकांच्या वैचारीक मागासलेपणाचा सामना करीत

त्यांनी आपले शैक्षणिक धोरण आखले व राबवले.

राजर्षी शाहू महाराजांची शैक्षणिक भूमिका:

शिक्षणाची गंगा समाजाच्या तळागळापर्यंत जाऊन पोहचली पाहीजे, समाजातील अगदी शेवटचा माणून सज्ञान झाला पाहिजे, आपला समाज सर्व अर्थानी उन्नत व्हावा ही शाहू महाराजांची महत्वकांक्षा होती, कालबाह्य झालेला हा समाज हा नवसमाजाची निर्मिती होऊ देत नव्हता त्यावर शिक्षण हाच एकमेव उपाय आहे, असे शाहू महाराजांचे ठाम मत होते.

शिक्षण हे साधन आहे:

शाहू महाराज प्रामूख्याने बुद्धीप्रामाणवादी होते. शिक्षण हे समाजसूधारणा आणि सामाजिक जागृतीचे प्रमुख साधन आहे, असे त्यांचे मत होते. छत्रपती शाहू महाराजांनी बहूजनांच्या शिक्षण वंचिततेचे हे दुष्टचक्र भेदायचे ठरवून आपल्या प्रजेसाठी शैक्षणिक धोरण राबविले. त्यांनी ३० सप्टेंबर १९१७ रोजी कोल्हापूर संस्थानात सक्तीचा व मोफत शिक्षणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

स्त्रीशिक्षण :

राजर्षी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाकडेही विशेष लक्ष दिले होते. आपल्या राज्यात दौरे केल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की, मुलींच्या शाळेची नितांत आवश्यकता आहे. म्हणून त्यांनी भूदरगड, गडहिंग्लज भागात मूलींची शाळा काढण्याचा आदेश त्यांनी दिला. अनेक स्त्रियांना त्यांनी शिक्षणासाठी आर्थिक मदत केली. स्त्रियांच्या सर्वांगीन विकासासाठी त्यांनी टप्प्याटप्प्याने वाटचाल केली.

कोल्हापूर वस्तीगृहांचे माहेरघर:

दारीद्र्यामध्ये खितपत पडलेल्या बहुजन समाजाला शिक्षण घेणे सूलभ व्हावे म्हणून शाहू महाराजांनी गरीब मुलांसाठी कोल्हापूरात अनेक वसतिगृह सुरू केले होते. मुस्लीम बोर्डींग, लिंगायत बोर्डींग, सारस्वत बोर्डींग, आर्य समाज बोर्डींग इ. सारखी वसतिगृह सुरू करून विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय केली.

शिक्षणातून समाजपरिवर्तन:

जातीभेद, अंधश्रद्धा, निरक्षरता इ. मूळे मागास राहीलेल्या संस्थानातील प्रजेला शिक्षणातून आधूनिक बनवण्याची गरज शाहू महाराजांनी ओळखलेली होती. शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

मोफत व सक्तीचे शिक्षण:

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात २१ सप्टेंबर १९१७ रोजी मोफत सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. शिक्षण घेणे, देणे सक्तीचे केले. सर्वांना शिक्षण हे अनिवार्य केले.

अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शैक्षणिक क्षेत्रात अभिनव प्रयोग केला.

राजर्षी शाहू महाराजांचे कृषी धोरण :

प्राचीन काळापसून आपला देश हा कृषीप्रधान देश होता. आजही आधूनिक उद्योगधंद्याचा बऱ्यापैकी विकास होऊनही तो कृषीप्रधान समजला जातो. शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. शेती उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार पर्यायाने देशाचा उद्धार हे लक्षात घऊन राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शेतीसाठी व जलसंवर्धनासाठी मूलभूत सूधारणा केल्या. त्याला जोड म्हणून उद्योगधंदे सूरू केले यातून सहकार तत्वाला उर्जा दिली. म्हणून आज महाराष्ट्रात शेती व जलनितीचे क्षेत्रात कोल्हापूर आघाडीवर आहे. या प्रगतीचा पाया अनेक वर्षापूर्वी शाहू महाराजांनी घातला.

कृषी विषयक दृष्टिकोन:

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या कृषी विकासाला महत्त्वाचे स्थान दिले होते. कृषी हा भारताचा पारंपारिक व प्राचीन व्यवसाय असून संस्थानातील ८० टक्के लोक कृषी क्षेत्रावर अवलंबून होते. शाहू महाराजांनी इ.स.१८९४ ते १९२२ या त्यांच्या कारकिर्दीत कृषी विकासासाठी भरीव योगदान दिले. कृषी विकासाची चळवळ त्यांच्या भाषणातून स्पष्ट दिसून येते.

कृषी अर्थव्यवस्थेचे महत्त्व:

शाहू महाराज आणि कृषी अथव्यवस्थेचे महत्त्व लक्षात घेऊन संस्थानातील कृषी सुधारणावर भर दिला होता. शेतकऱ्यांचे अज्ञान व भोळेपणा, भांडवलाची कमतरता, शेतीचे विभाजन, बाजारपेठेची समस्या इ. कृषी समस्यांचा त्यांना सखोल अभ्यास केला. कृषी अर्थव्यवस्थेचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यात कृषी धोरण राबविले. शेतकरी कर्जमुक्ती, शेतकरी शिक्षण व कृषी जलसिंचन सुधारणा यावर शाहू महाराजांनी भर दिला.

कृषी संशोधनावर भर:

शाहू महाराजांनी कृषी संशोधनावर कोल्हापूर संस्थानात मोठ्या प्रमाणात भर दिला. संस्थानात चहा-कॉफी सारख्या नवीन पिकांची लागवड केली. पडीत जमीन लागवडी योग्य बनवली. नगदी पिके व व्यापारी पिके लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले.

कृषी शिक्षण व शेतकरी शिक्षणावर भर :

शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करून त्यांनी कृषी शिक्षण दिल्याशिवाय शेतीची प्रगती होणार नाही. अशी भूमिका शाहू महाराजांची होती. कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञान आणायचे आल्यास शेतकऱ्यांचे शिक्षण होणे गरजेचे आहे. १८९६ मध्ये शेती हा नवीन विषय सुरू केला.

कृषी प्रदर्शनाचे आयोजन:

शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे व नवीन कृषी तंत्राची माहिती करून देण्यासाठी महाराजांनी कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले. शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शनातून प्रेरणा मिळत असे.

कृषी कर्ज पुरवठा:

कृषी वकास हा भांडवलाशिवाय होऊ शकरणार नाही हे शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यांनी संस्थानात कर्जपुरवठ्याच्या विविध योजना हाती घेतल्या. १९०४ मध्ये विक्टोरीया फंड या संस्थेची स्थापना केली. शाहू महाराजांनी कृषी विकासासाठी एकूण २५,५३,२८० रु. इतका कर्जपूरवठा केला होता.

अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी शेती व शेतकऱ्यांच्या

विकासासाठी मोलाची कामगिरी केली.

समारोपः

महाराष्ट्रातील पुरोगामी सुधारक म्हणून राजर्षी शाहू महाराजांना ओळखले जाते. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून विविध सामाजिक कार्य, महिलांविषयक कार्य, शिक्षणविषयक कार्य, जातीभेद निर्मुलनविषयक कार्य, अंधश्रद्धा निर्मूलन, शेतकऱ्यांविषयक कार्ये, कलावंताविषयी कार्य अशा विविध सामाजिक कार्याच्या माध्यमातून समाजात सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराज हे केवळ बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते.

पुरोगामी विचारसरणी रुजविण्याच्या दृष्टीने त्यांनी केवळ विचार केले नाही तर ते प्रत्यक्षात उतरवीले त्यांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक सुधारणा केल्या. त्यांनी सर्व सामान्य बहुजन वर्गासाठी आपले राजपद पणाला लावले. त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग बहुजन हितासाठी केला. जनहितासाठी त्यांनी अनेक कायदे केले. अशाप्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी समाजहितासाठी अनेक कार्य केली.

करवीररत्न शाहू माझा...

शुभम अनिल मोहिते
बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान प्रथम वर्ष

शिक्षणाचा दिपस्तंभ स्वराज्याचा पुर्नआरंभ
अस्पृशांचा आधारस्तभ शाहू माझा ।।१।।
बहुजनांचा कैवारी दिनदुबळ्यांचा वाली
सामाजिक सर्वदूरविचारी श्री शाहू माझा ।।२।।
मराठाक्रांतीचे वादळ, ज्ञानहितवादाची वेळ
अन्यायाशी लढण्या 'स'बळ शाहू माझा ।।३।।
धैर्याची शक्ती, विचाराची युक्ती,
कनिष्ठांची उन्नती राजर्षी शाहू माझा।।४।।
लोकशाहीचे आद्यप्रवर्तक, लोकाभिमुख प्रशासक
कर्मकांड विरोधक शाहू माझा ।।५।।
समाजवादी लोकराजा, राजयोगी महाराजा,
खरा कर्मयोगी राजा शाहू माझा।।६।।
फुले आणि कर्मवीर सोबतीला आंबेडकर,
शिवरायांचा विचार शाहू माझा ।।७।।
कलेचा आश्रयदाता, बंधुतेतली एकात्मता,
राजवाड्यातला लोकनेता छत्रपती शाहू माझा।।८।।
स्वातंत्र्य, समता, बंधुता त्रिगुणाची एकात्मता
हे वर्म जाणणारा नेता शाहू माझा ।।९।।
समाज हितकारक राष्ट्राचे उद्धारक
माझे स्फुर्तीदायक शाहू माझा ।।१०।।

राजर्षी शाहू महाराजांची कार्ये

वाघे गौरी केशव
बी.ए. द्वितीय वर्ष

प्रस्तावना :

राजर्षी शाहू महाराज हे दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर या लहानशा संस्थानाचे अधिपती होते, परंतु एक संस्थानाधिपती यापेक्षा महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे महान नेते, हीच त्यांची खरी ओळख आहे. येथील बहुजन समाजावर त्यांनी त्यांची खरी ओळख आपले दैवतच मानले आहे. राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कोल्हापूर हे त्यांचे जन्मस्थळ त्यांचा जन्म कोल्हापूर येथील राजवाड्यात झाला. हे स्थळ आता विश्रामधाम म्हणून ओळखले जाते.

राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक कार्यः

राजर्षी शाहू महाराजांच्या काळात बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता, शिक्षण ही फक्त वरिष्ठ वर्गाचीच मक्तेदारी बनी होती. येथील बहुजन समाजाच्या मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्यातील शिक्षणाचा मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्यातील शिक्षणाचा अभाव होय, ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखली म्हणून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या कार्याला त्यांनी आग्रक्रम दिला.

वसतिगृहांची स्थापनाः

महाराजांनी त्या दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे कोल्हापूरात निरनिराळ्या जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी केलेली वसतिगृहांची स्थापना होय. वसतिगृह ही त्या काळातील एक महत्त्वाची गरज होती, कारण त्या काळी शिक्षणाच्या सोयी फक्त शहरातच उपलब्ध होत्या. ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोक अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होते. सहाजिकच, आपल्या मुलांना शिक्षणासाठी शहराच्या ठिकाणी पाठविण्याची कुवत त्यांच्याकडे नव्हती.

तेव्हा ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांचे शिक्षण मार्गी लावायचे असेल, तर शहरात त्यांच्या वास्तव्याची अल्पखर्चात व्यवस्था करणे गरजेचे आहे, ही गोष्ट शाहू महाराजांच्या लक्षात आली. म्हणून त्यांनी कोल्हापूरात वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १८ एप्रिल, १९०९ रोजी मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरीया मराठा बोर्डींग हाऊस' ची स्थापना करण्यात आली.

विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीः

बहुजन समाजातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या देऊन त्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देण्याचे धोरण राजर्षी शाहूंनी अवलंबिले होते. २० मे १९११ रोजी त्यांनी एक जाहीरनामा काढून १५ टक्के विद्यार्थ्यांना नादारी आदेशही त्यांनी काढला. देण्याची घोषणा केली ही सवलत प्रथम गरीब विद्यार्थ्यांना देऊन

नंतर राहिल्यास इतर विद्यार्थ्यांना द्यावी, असा आदेश त्यांनी काढला.

सक्तीचे व माफत प्राथमिक शिक्षण :

राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षण क्षेत्रात उचललेले आणखी एक क्रांतिकारक पाऊल म्हणजे त्यांनी आपल्या राज्यात राबविलेली सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना होय. ८ सप्टेंबर १९१७ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यासंबंधीचा आदेश जरी केला. त्या संदर्भात आपले विचार व्यक्त करताना महाराजांनी म्हटले होते. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास मोफत शिक्षणाची हिंदूस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत, म्हणून सक्तीच्या व ३० सप्टेंबर १९१७ पासून ही सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना करवीर संस्थानात लागू झाली. करवीर तालुक्यातील चिखली या गावी सक्तीचे पण माफत प्राथमिक शिक्षण देणारी पहिली शाळा ४ मार्च १९९८ रोजी सुरु झाली.

राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यांद्धाराचे कार्य

पददलित व मागासलेल्या वर्गाची उन्नती हे शाहू महाराजांनी आपले जीवितकार्य मानले होते. साहजिकच, अस्पृश्यांवरील अन्यायाचे निवारण करण्यासाठीही ते सतत प्रयत्नशील राहिले. अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून १९०७ मध्ये राजर्षींनी त्यांच्यासाठी कोल्हापूरात 'मिस क्लार्क बोर्डींग' या नावाचे एक वसतिगृह उभारले १४ एप्रिल १९०८ पासून या वसतिगृहाचे कामकाज प्रत्यक्षात सुरू झाले.

अर्थात, अस्पृश्यतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी अस्पृश्यांना प्रथम आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभ राहता येईल, अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे, याची महाराजांना जाणीव होती. म्हणून त्यांनी अस्पृश्यांना स्वतंत्र व्यवसाय सुरू करण्यात प्रोत्साहन दिले.

त्यासाठी अस्पृश्यजातीच्या लोकांना उपहारगृहे २ दुकाने चालविण्याकरिता त्यांनी आर्थिक सहाय्य केले. अस्पृश्यांना मानाने जगता यावे म्हणून शाहू महाराजांनी त्यांना सरकारी नोकऱ्या मिळवून दिल्या. जे सरकारी अधिकारी किंवा नोकर या आदेशांचे पालन करणार नाहीत, त्यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. राजर्षी शाहूंनी अस्पृश्यांची गुलामगिरी नष्ट करण्याच्या उद्देशाने १८ सप्टेंबर १९१८ रोजी आपल्या राज्यातील महार वेतने रद्द केली आणि त्या जमिनी अस्पृश्यांच्या नावावर करुन दिल्या.

समाजसुधारणेच्या क्षेत्रातील कार्य

अस्पृश्यता निवारणाच्या कार्यांबरोबरच अन्य प्रकारच्या सामाजिक सुधारणांना चालना देण्याचे कार्यही शाहू महाराजांनी केले होते. समाजसुधारणेच्या बाबतीत त्यांचा दृष्टिकोन अत्यंत पुरोगामी होता. जातिभेदाला त्यांचा विरोध होता. जातिभेद नष्ट झाल्याखेरीज आपल्या समाजाची उन्नती होणार नाही, असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून जातिभेद दूर करण्यासाठी त्यांनी प्रयत्न चालविले होते.

कार्य:

शाहू महाराजांनी बहुजन समाजात शिक्षणप्रसार करण्यास विशेष भर दिला. त्यांनी कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून त्यांनी राजाज्ञा काढली. त्यांचे शिक्षण ब्रिटीश अधिकारी फ्रेजर यांच्या हाताखाली झाले. पुढील शिक्षण राजकोटच्या राजकुमार कॉलेजमध्ये व धारवाड येथे झाले.

सामाजिक सुधारणा:

छत्रपती शाहूंनी १८९४ ते १९२२ पर्यंत २८ वर्षे कोल्हापूरच्या गादीवर कब्जा केला आणि या काळात त्याने आपल्या साम्राज्यात अनेक सामाजिक सुधारणे सुरू केल्या. खालच्या जातीसाठी बरेच काम करण्याचे श्रेय शाहू महाराजांना दिले जाते आणि खरच हे मुल्यांकन पक्की आहे. अशाप्रकारे त्यांनी सुशिक्षित विद्यार्थ्यांना योग्य रोजगार मिळवून दिला.

हा इतिहासातील सर्वात जुना होकारार्थी कृती (दुर्बल घटकांसाठी ५० टक्के आरक्षण) बनला आहे. यातील बरेच उपाय २६ जुलै१९०२ रोजी लागू झाले. रोजगार मिळावा म्हणून त्यांनी १९०६ मध्ये शाहू छत्रपती विणकाम व स्पिनिंग मिल सुरू केली. राजाराम कॉलेज शाहू महाराजांनी बांधले आणि नंतर त्यांच्या नावावर ठेवले. त्यांचे शिक्षण शिक्षणावर भर होते आणि लोकांपर्यंत शिक्षण उपलब्ध करून देणे हे त्यांचे उद्दीष्ट होते. आपल्या विषयातील शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक कार्यक्रम सुरू केले.

त्यांनी समाजातील संघटित घटकांसाठी मिस क्लार्क बोर्डिंग स्कूलची स्थापना केली. मागास जातीतील गरीब पण गुणवंत विद्यार्थ्यांसाठी त्यांनी बऱ्याच शिष्यवृत्ती सुरू केल्या. तसेच त्यांनी आपल्या राज्यात सर्वांसाठी सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले.

त्यांनी चांगले प्रशासक बनविण्यासाठी त्यांनी गाव प्रमुख किंवा पाटलांसाठी खास शाळा सुरू केल्या छत्रपती शाहू समाजातील सर्व स्तरातील समानतेचे प्रबल समर्थक होते आणि त्यांनी ब्राह्मणांना विशेष दर्जा देण्यास नकार दिला. त्यांनी १९१६ मध्ये निपाणी येथे 'डेक्कन दंगल' संघटनेची स्थापना केली.

राजर्षी शाहू महाराजांचे योगदान काय होते:

आपल्या राजवटीत त्यांनी समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी जाती भेदभाव व्यवस्थेत अनेक क्रांतीकारी योजना सुरू केल्या. त्यांनी आपल्या राज्यामध्ये सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षणही सुरू केले. राजर्षी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी शाश्वत उपाययोजना केल्या.

आरक्षणातून प्रगती:

चातुवर्णव्यवस्था प्रचंड मोठ्या प्रमाणावर बोकाळलेली असल्यामुळे आणि प्रत्येकाला जातीनुसार काम वाटून दिले असल्यामुळे

अस्पृश्य समाजात प्रगती होत नव्हती. शिक्षण नव्हते, जीवनमान उंचवाचे म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी नोकऱ्यांमध्ये पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याची क्रांतिकारी घोषणा करून २६ जुलै १९०२ ला लंडनहून आदेश काढून क्रातिकारी पाऊल उचलले आहे.

आंतरजातीय विवाहाला मान्यताः

स्त्रियांच्या प्रगतीसाठी आणि जातीयता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी कार्य केले. १९१८ साली त्यांनी आपल्या राज्यात आंतरजातीय विवाहाला मान्यता देणारा कायदा केला. स्वतःच्या घरात धनगर घराण्याशी नाते जूळून कृतीत उतरवून आणला.

व्यापार, कला, क्रिडा, साहित्य व इतर कलांना मदतः

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांना व्यापार, कला, नाट्य, संगीत या विषयीही आवड व आदर होता. व्यापारी क्षेत्रात गरुड झेप घेऊन सूतगिरण्या कापडगिरण्या वाढविल्या, राधानगरी धरण अस्तित्वात आणले. शेतीसाठी, शेतकऱ्यांसाठी बंधारे बांधले.

स्त्री-शिक्षणासाठी प्रयत्नः

शाहू महाराजांनी करवीर संस्थान स्त्री शिक्षणाविषयी अत्यंत पुरोगामी धोरण स्वीकारले होते. संस्थानातील स्त्री शिक्षणाची व्यवस्था पाहण्यासाठी त्यांनी स्त्री शिक्षणाधिकाऱ्यांचे विशेष पद निर्माण केले होते. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीतही शाहू महाराजांनी उदार दृष्टिकोन ठेवला. राजाराम कॉलेजमध्ये शिकवणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी शिक्षण मोफत केले. रखमाबाई यांच्याच मुलीना, कृष्णाबाई यांना महाराजांनी वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईच्या ग्रॅट मेडीकल कॉलेजमध्ये पाठवले व डॉक्टर बनवले.

बहुजन समाज सुशिक्षित झाल्याशिवाय त्यांचा उद्धार होणार नाही. त्यांच्या मागासलेपणाचे एक महत्त्वाचे कारण त्यांच्यातील शिक्षणाचा अभाव होय ही गोष्ट शाहू महाराजांनी ओळखून बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार करण्याचे ठरविले.

- इ.स. १९०१ मध्ये त्यांनी मराठा विद्यार्थ्यांसाठी 'व्हिक्टोरीया मराठा बोर्डींगची' स्थापना केली. त्यांनी कोल्हापूरात निरनिराळ्या जातिधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची स्थापना केली.
- इ.स. १९०२ मध्ये राजर्षी शाहूंनी आपल्या राज्यातील सरकारी नोकऱ्यांत मागास वर्गांसाठी पन्नास टक्के जागा राखून ठेवण्याचा क्रांतीकारी निर्णय घेतला.
- इ.स. १९०६ मध्ये शाहू महाराजांनी शाहू छत्रपती 'पिनिंग आणि विव्हिंग मिल' चा पाया घातला.
- इ.स. १९०७ मध्ये सहकारी तत्वावर एक कपडा गिरणीची त्यांनी उभारणी केली.

राजषी शाहू महाराज करवीर संस्थानाचे राजे होते. मात्र, त्यांनी कारभार करताना संपूर्ण भारताचा विचार करून समाजाला नवी दिशा देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. सहकार, कृषी, सामाजिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांनी उत्तुंग कामगिरी केली. राजर्षी शाहू महाराजांचे चरित्र ग्रंथ ज्या निवडक चरित्रकारांनी लिहिले त्यामध्ये प्रा. डॉ. रमेश जाधव यांचा समावेश आहे.

कशाप्रकारे राजर्षी शाहू महाराज हे सामान्य माणसात मिसळणारे, सामान्यांसाठी झटणारे राजा होते. सामाजिक लोकशाही निर्मितीसाठी शाहू महाराजांनी अतोनात कष्ट उपसले. सर्वांना न्याय मिळावा, माणुसकीची वागणूक मिळावी, वैज्ञानिकता त्यांच्या अंगी यावी म्हणून त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग केला.

...राजर्षी शाहू
होता शूर अन तिकाच दिलदार शाहू राजा
राज्यात त्यांच्या सदा सुखीच होती सारी प्रजा
जाणून घेतले हृदयापासनी दुःख शुद्र-अतिशुद्रांचे
जीवन सारे अर्पिले दुःख दूर करण्या तयांचे
केले अनक कायदे स्त्रीमुक्तीसाठी राजा शाहूने
शिक्षा केले खुले सर्वांसाठी तोडूनी सारी बंधने
कला, संस्कृती अन् साहित्याचाही राखला सदा सन्मान
राजातला माणून अन् माणसातला राजा होता मोठा विद्वान

संदर्भ :

१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज विचार आणि कार्य - प्रा. डॉ. शिरीश पवार



लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विषयासंदर्भातील (मर्यादित) संदर्भसूची

अ.क्र.	लेखकाचे नाव	पुस्तकाचे नाव	प्रकाशन
१.	कीर, धनंजय	प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, श्री. शाहू स्मारक व्याख्यानमाला पहिले पुष्प, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१९७०
२.	कीर, धनंजय	लोकमान्य टिळक आणि राजर्षी शाहू एक मुल्यमापन	१९७१
३.	कुरणे द.य.	राजर्षी छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या आठवणी	१९६८
४.	कुलकर्णी मीना	श्री. शाहू छत्रपतींचे अर्थकारण	१९७५
५.	खेणे बी.डी., संगवे विलास	राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स-खंड २	
६.	जाधव, भगवानराव	राजर्षी श्री. शाहू महाराजांची भाषणे	१९७१
७.	जाधव बी. बी.	राजर्षी शाहू महाराजांची भाषणे	१९७१
८.	जाधव रमेश	लोकराजा राजर्षी शाहू	
९.	जाधव रमेश	राजर्षी शाहू छत्रपती : वाद आणि वास्तव	
१०.	ठुले आ. बा.	श्री.छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र	
११.	तोफखाने वा. द.	राजर्षी श्री शाहू छत्रपती यांचे अंतरंग	
१२.	धारावकर भास्कर (संपादक)	शाहू छत्रपतींचे निवडक आदेश भाग - १	
१३.	नाईक तु. बा.	छत्रपती राजर्षी शाहू महाराज	युनिर्व्हसल प्रकाशन १९७८
१४.	पवार आप्पासाहेब(संपादक)	राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स खंड-१	
१५.	पवार वसुधा	समाज क्रांतीकारक राजर्षी शाहू छत्रपती	
१६.	पाटील बा. आ.	राजर्षी शाहू छत्रपती	
१७.	फडके य. दि.	शाहू छत्रपती आणि लोकमान्य	
१८.	फाटक न. र.	शाहू स्मारक व्याख्यान	१९७२
१९.	फाटक न. र.	श्री शाहू छत्रपती सामाजिक सुधारनेबाबत विचार जागृती, श्री शाहू स्मारक व्याख्यानमाला पुष्प तिसरे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	१९७२
२०.	बगाडे द. रा.	शाहू महाराज आणि कायदेकानून	पद्म प्रकाशन १९८२
२१.	बन्ने डी. एस.	राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ	
२२.	बागल माधवराव	छत्रपती श्री शाहू महाराज यांच्या आठवणी	१९५०
२३.	बाबर कृ. भा.	शाहू महाराजांची माणसे	
२४.	भागवत रा. तु.	राजर्षी शाहू छत्रपती जीवन व शिक्षण	चैतन्य प्रकाशन १९६४
२५.	भोसले एस. एस.	क्रांतीसुक्ते : राजर्षी छत्रपती शाहू	
२६.	मंगुडकर मा. प.	महाराष्ट्रातील समाज प्रबोधन आणि छत्रपती शाहू महाराजांचे कार्य	१९७५
२७.	येडेकर श्याम	राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे	
२८.	शिर्के दा.म.	कोल्हापूरचा राज्यकारभार	
२९.	साठम ह. ना.	आधुनिक भगीरथ राजा शाहू	
३०.	साळुंखे पी. बी. (संपादक)	राजर्षी शाहू गौरवग्रंथ	
३१.	सुर्यवंशी कृ.गो.	राजर्षी शाहू : राजा व माणूस	

प्रदुषण : एक समस्या

शेख सुफिया लुखमान
एम.ए. द्वितीय वर्ष

अरे मानवा नको करू प्रदुषण
होऊ नको रे या प्रदुषणाचे कारण
तू थांबव रे आता तरी प्रदुषण
नको आणू-रे जवळ मरण

या पर्यावरणीय प्रदुषणामुळे अनेकवेळा मानवी जिवणावर व सजीवसृष्टीवर अनिष्ठ परिणाम होत आहेत. जर आपल्याला हवा प्रदुषण, वायु प्रदूषण, जल प्रदूषण थांबवायचे असेल तर आपल्याला वृक्ष लागवडी शिवाय पर्याय नाही.

हवेचे प्रदूषण माणसांच्या स्मरणशक्तीला बाधा आणते. त्यांना वैफल्यग्रस्त करते असे ओडियो स्टेट विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी शोधून काढले. प्रदूषित हवेत श्वसन केल्याने माणसाच्या मेंदूतील जडणघडणीवर विपरीत परिणाम होतो. असे तिथल्या संशोधनातून सिद्ध झाले आहे. जल प्रदूषणामुळे तर मानवाचे जगणेच कठीण झाले आहे. माणूस पाण्याविना अन हवेविना जगूच शकत नाही. याच गोष्टी जर प्रदुषित असतील तर मानवाचे काय होईल?

आपल्या देशात शहरीकरण, औद्योगिकरण, कारखानदारी आदी कारणांमुळे जंगल तोड होत आहे. त्यामुळे खूप मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे. तसेच कारखाण्यांचे दुषित रासायनिक पाणी नदीत सोडले जात आहे, त्या जल प्रदुषणामुळे अनेक साथीचे रोगही निर्माण होत आहेत. उदाः डेंग्यू, मलेरिया यासारखे संसर्गजन्य रोग होताना दिसतात.

दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात रासेयो स्थापना दिनानिमित्त 'वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन : काळाची गरज' या विषयावर मार्गदर्शन करतांना माजी आमदार श्री पाशा पटेल व मंचावर उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे व रासेयो चे विद्यार्थी इ.

पुढे बोलताना माजी आमदार पाशा पटेल म्हणाले की, शाहू महाविद्यालयाने शैक्षणिक उपक्रमासोबतच वृक्षारोपणाचा एक नवा पॅटर्न

निर्माण केला आहे आणि भारतातील सर्व नद्यांच्या काठावर वेगवेगळ्या महाविद्यालयातील युवकांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करुन हा वृक्षलागवडीचा हा शाहू पॅटर्न संपूर्ण देशात पोहचणार आहे. असेही ते म्हणाले.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ७५००० वृक्षारोपांची लागवड केली जात आहे. असे कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांनी सांगितले. डॉ. अनुजा जाधव यांनी मुल्यशिक्षण या विषयावर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी आपले सामाजिक शैक्षणिक व कर्तव्याचे भान ठेवून कार्य करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमात मंचावर प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, सामाजिक कार्यकर्ते श्री अच्युतराव गंगणे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.पुष्पलता त्रिमुखे, प्रा.विजय गवळी इत्यादी व सभागृहात मोठ्या संख्येने इतर प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कल्याण सावंत, सूत्रसंचालन प्रा. सोमदेव शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.विजय गवळी यांनी केले.

१६) शाहू महाविद्यालयाने 'साखरा' वनक्षेत्रात १६ एकर जागेवर केली ७००० वृक्षरोपांची लागवड:

दिनांक २५ सप्टेंबर २०२२ राजर्षी शाहू महाविद्यालयातील मूल्यशिक्षण अभ्यासक्रम व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक २५ सप्टेंबर २०२२ रोजी ता. जि. लातूर च्या मौजे - साखरा गावातील वन क्षेत्राच्या १६ एकर जागेवर ७००० वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. या वृक्ष लागवड अभियानामध्ये शाहू महाविद्यालयातील वेगवेगळ्या विभागातील १२५० विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचलित राजर्षी शाहू महाविद्यालय(स्वायत्त), लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने या दीड-दोन वर्षांमध्ये ७५००० वृक्षलागवडीचे संकल्प केलेला आहे. महाविद्यालयांने सातत्याने वेगवेगळ्या ठिकाणी आतापर्यंत २०००० वृक्षरोपांची लागवड केलेली आहे.

लातूर मधील जंगल क्षेत्राचे प्रमाण १% पेक्षा कमी आहे. म्हणूनच लातूरच्या जंगल क्षेत्राचे प्रमाण वाढवण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गांभीर्यपूर्वक दखल घेत मूल्यशिक्षणाचे धडे गिरवणा-या विद्यार्थ्यांना सोबत घेऊन मौजे साखरा गावाच्या पूर्वेला जे १६ एकर चे वनक्षेत्राची रिकामी जागा पडून होती. या वन क्षेत्राच्या जागेत पिंपळ, आंबा, चिंच, सीताफळ, कडू लिंब, साग, करंज, जांभूळ व इतर अनेक प्रजातींच्या झाडांच्या वृक्षरोपण ची लागवड करण्यात आली. लातूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मा. बी.पी. पृथ्वीराज यांनी स्वतः एक वृक्षरोप लागवड करत मौजे साखरा येथील वनक्षेत्रात वृक्ष लागवड कार्यक्रमाचे उदघाटन केले.





दि. २५ सप्टेंबर २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील 'मूल्य शिक्षण अभ्यासक्रम' व 'राष्ट्रीय सेवा योजना' विभागातर्फे लातूर जिल्ह्यातील मौजे साखरा गावातील वन क्षेत्रात ७००० वृक्षारोप लागवड कार्यक्रमात उपस्थित लातूर चे जिल्हाधिकारी मा. श्री बी.पी. पृथ्वीराज, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

सदर वृक्ष लागवड अभियान यशस्वी करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, मूल्यशिक्षण अभ्यासक्रम कमिटीचे चेअरमन डॉ.अनुजा जाधव, आयक्युएसी को- ऑरडिनेटर डॉ. अभिजित यादव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, रासेयो +२ स्तर चे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, वृक्ष लागवड समन्वय समितीचे सदस्य प्रा.विजय दळवी, प्रा. सुर्यकांत चव्हाण, प्रा. किशोर शिंदे, प्रा. चंद्रशेखर दवने, डॉ.अर्चना टाक, प्रा. सायली समुद्रे, प्रा. व्यंकट धुमाळ, डॉ. निशांक पिंपळे, डॉ.संदीपान हाडुळे, प्रा. माधव शेळके, प्रा.नितीन पांचाळ, प्रा. प्रमोद जैन, प्रा. वैभव माने, प्रा. अर्चना रणदिवे, प्रा. विश्वनाथ पांचाळ, प्रा. रियाज शेख, प्रा.ज्योती माशाळकर, प्रा.श्रद्धा जाधव, प्रा. प्रशांत जोशी, प्रा.चेतना आहाळे, प्रा. शुभम जाधव प्रा. चंद्रप्रभा कुलकर्णी व इतर प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व वृक्ष प्रतिष्ठान चे सदस्य अनिल वारद ,अरिहंत , मस्के , लक्ष्मण , अनिता देशपांडे , कविता सावंत , बिराजदार मॅडम , बालाजी जोशी यांनी विशेष प्रयत्न केले.

१७) राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबीरात शाहू च्या विद्यार्थीनीचा सहभाग:

दिनांक २८ ते ३० सप्टेंबर २०२२ दरम्यान 'राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड चाचणी शिबीर' शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पार पडला या शिबिरात राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील वरिष्ठ महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व जिल्हा समन्वयक डॉ. कल्याण सावंत व विद्यार्थी स्वयंसेवक श्याम बैनबोने, मगर अभिजित, कदम निकिता व कनिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विद्यार्थ्यांनी स्वयंसेविका कु. बोयने निकिता नारायण (इयत्ता १२वी कला) हिने सहभाग नोंदविला. प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर चे विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, लातूर विभाग, लातूर रासेयो + चे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

१८) राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री:

दिनांक ०२ ऑक्टोबर २०२२ राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, ग्रंथपाल श्री.एस.बी. मस्के, ग्राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय अशोक गवळी, सेवक श्री गोविंद जाधव, श्री धनु राठोड व इतर उपस्थित होते.

१९) मा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त बाभळगाव रोड येथे वृक्षारोपण:



दिनांक ०३ ऑक्टोबर २०२२ रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर चे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त 'महाराणा प्रताप नगर, बाभळगाव रोड' येथे वृक्षारोपण करतांना रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व स्वयंसेवक विद्यार्थी इत्यादी.

दिनांक ०३ ऑक्टोबर २०२२ शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आज दिनांक ०३ ऑक्टोबर २०२२ रोजी 'महाराणा प्रताप नगर, बाभळगाव रोड, लातूर' या ठिकाणी ९३ वृक्षरोपांची लागवड करण्यात आली. यावेळी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. शुभम जाधव व ४७ विद्यार्थी स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

२०) शाहू महाविद्यालयात 'नो व्हेईकल डे' साजरा:

दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी पर्यावरण व नैसर्गिक साधन संपत्तीचे संवर्धन करण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नो व्हेकलडे साजरा करण्यात आला यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी सदर दिवशी कोणीही चार चाकी किंवा दुचाकी वाहन महाविद्यालयात आणले नाही. महाविद्यालयात येण्यासाठी सर्वांनी यावेळी सार्वजनिक वाहनांचा किंवा सायकलचा वापर करून पर्यावरण संरक्षण करण्यासाठी आपले अनमोल योगदान दिले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

२१) डॉ. गोपाळराव पाटील साहेबांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर:



दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर चे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिरात उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. दिपक वेदपाठक, वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवकांता बामणे, डॉ. सुमित कयटलवार, डॉ. सिद्धेश्वर चौधरी, डॉ. स्वाती फेरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, प्रा.शुभम जाधव, इतर प्राध्यापक शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

लातूर: दिनांक ११ ऑक्टोबर २०२२ रोजी (प्रतिनिधी) राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर

यांच्या सहकार्याने शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. गोपाळराव पाटील साहेब यांच्या ९२ व्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर, कर्मचारी व विद्यार्थी यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात ५१ पिशव्या रक्ताचे संकलन झाले.

या शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, आयक्यएसी को-ऑर्डिनेटर डॉ. अभिजित यादव, कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. दिपक वेदपाठक, प्रा. रंजीत शिंदे, प्रा. युवराज शिखरे, डॉ. नितीन भालके, डॉ. स्वाती फेरे, प्रा. शुभम जाधव, श्री. महेश शिंदे, श्री. गोविंद जाधव तसेच वैद्यीय महाविद्यालयाचे डॉ. शिवकांता बमणे, डॉ. सुमित कयटलवार, डॉ. सिध्देश्वर चौधरी, श्री. बी.डी. सुर्यवंशी, श्री. गौरीशंकर स्वामी, श्री. हणमंत देढे, सामाजिक कार्यकर्ते श्री. बळीराम कांबळे, श्री. दिनेश सुर्यवंशी, यांचे मोलाचे सहकार्य.

२२) लातूर परिसरात 'स्वच्छ भारत अभियान':

१९ ऑक्टोंबर २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर परिसरात प्लास्टिक जनजागृती रॅली काढून 'स्वच्छ भारत अभियान' राबविण्यात आले. या कार्यक्रमात शहरातील गंजगोलाई भागात व परिसराच्या दुकानातील प्लास्टिक जमा केले. व ते महाविद्यालयात महानगरपालिकेची घंटागाडी आल्यावर त्यांच्याकडे सुपूर्द केले. सदर अभियान राबविण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. सचिन भंडारे, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी परिश्रम घेतले.



दिनांक १९ ऑक्टोबर २०२२ रोजी 'स्वच्छ भारत अभियान' राबवितांना रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. विजय गवळी, प्रा.शुभम जाधव, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

२३) स्व.इंदिरा गांधी पुण्यतिथी व स्व. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंतीनिमित्त सांप्रदायिक एकात्मता कार्यक्रम:

दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात स्व.इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व भारताचे लोहपुरुष स्व. सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय एकता दिना निमित्त सांप्रदायिक एकात्मतेची सामुहिक शपथ घेण्यात आली व रासेयो स्वयंसेवकांची रॅली काढण्यात आली. याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत सर व प्रा. सोमदेव शिंदे सर तसेच ग्रंथपाल प्रा. मस्के सर, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



दिनांक ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी स्व. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी व भारताचे लोहपुरुष स्व. वल्लभभाई पटेल यांची जयंती निमित्त अभिवादन करतांना ग्रंथपाल डॉ. एस. बी. मस्के, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

२४) राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिरात शाहू महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक संचीत राजेंद्र पाटील चा सहभाग:

दिनांक ०२ ते ०७ नोव्हेंबर २०२२ दरम्यान महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने चिखलदरा येथे आयोजित राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिर संपन्न झाले. या साहसी क्रीडा शिबिरात शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वयंसेवक संचीत राजेंद्र पाटील याने सक्रिय सहभाग नोंदविला. त्याबद्दल प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी तीचे अभिनंदन अभिनंदन केले.

२५) शाहू महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्व निवड चाचणी शिबीर:

दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी (प्रतिनिधी): कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे दि. १९ ते २८ डिसेंबर २०२२ दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभागी होण्यासाठी दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) , लातूर राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा स्तरीय निवड चाचणी शिबीर संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या निवड चाचणीत लातूर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयातील एकूण ४८ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. त्यातून राज्यस्तरीय शिबिरासाठी २५ स्वयंसेवकांची निवड करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, रासेयो चे जिल्हा समन्वयक डॉ. कल्याण सावंत, क्षेत्रीय समन्वयक डॉ. संजय गांधी, परीक्षक डॉ. केशव आलगुले, प्रा. विजय दळवी, प्रा. विजय गवळी, प्रा. शुभम जाधव, डॉ. स्वाती फेरे इ. उपस्थित होते.



दि. २१ नोव्हेंबर २०२२ रोजी 'आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्व निवड चाचणी शिबीर' प्रसंगी मार्गदर्शन करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे व मंचावर उपस्थित उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, क्षेत्रीय समन्वयक डॉ. संजय गवई, परीक्षक डॉ. केशव आलगुले, रा.से.यो.चे जिल्हा समन्वयक डॉ. कल्याण सावंत, रासेयो कार्यक्रमाधिकारी, प्रा. विजय गवळी, प्रा. विजय दळवी, व रासेयो चे विद्यार्थी इ.

२६) शाहू महाविद्यालयातील हेल्थ केअर सेंटर येथे आरोग्य तपासणी शिबीर:

दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील हेल्थ केअर सेंटर मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिरात हेल्थ केअर सेंटर च्या विभागप्रमुख डॉक्टर स्वाती फेरे यांनी महाविद्यालयातील कर्मचारी यांची तपासणी केली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, सामाजिक कार्य विभागाचे प्राध्यापक शुभम जाधव यांनी उपस्थित राहुन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष सहकार्य केले.

२७) भारतीय संविधान दिवस साजरा:

दिनांक २६/११/२०२२ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे ग्रंथालय विभाग, राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करत 'भारतीय संविधान दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात भारतीय संविधानातील सर्व मूल्यांची जोपासना करण्यासाठी सामुहिक शपथ घेतली. यावेळी परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, कार्यालयीन अधीक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, प्रा. माधव शेळके, प्रा.दीपक वेदपाठक, प्रा. विजय दळवी व मोठ्या संख्येने प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ग्रंथपाल श्री.एस.बी.मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री. पांडुरंग भोगिले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.



दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी 'भारतीय संविधान दिवस' निमित्त मार्गदर्शन करतांना उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, ग्रंथपाल डॉ.एस.बी.मस्के, प्रा. माधव शेळके, प्रा. सुदर्शन पाटील, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

२८) राजर्षी शाहू महाविद्यालयात 'मतदार नोंदणी शिबीर':

दिनांक ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२२ मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२३ अंतर्गत राजर्षी शाहू महाविद्यालयात राज्यशास्त्र व रासेयो विभागाच्या वतीने 'मतदार नोंदणी शिबीर' सुरु आहे. दिनांक ३० नोव्हेंबर ते १ डिसेंबर २०२२ दरम्यान सकाळी १०:०० ते सायंकाळी ४:०० या वेळेत हे शिबीर चालू असणार आहे. ज्यांचे वय वर्षे १८ पूर्ण झाले आहे व

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यात आलेले नाही त्यांचे नाव मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी 'वोटर हेल्पलाईन ॲप' (Voter Helpline App) च्या माध्यमातून सदर नोंदणी केली जात आहे. 'मतदान करने हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे अधिकार आणि कर्तव्य आहे. म्हणून १८ वय वर्षे पूर्ण करणा-या प्रत्येक भारतीय नागरिकाने मतदार यादीत नाव नोंदणी करुन घ्यावे.' असे आवाहन प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांनी केले आले आहे. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. संदीपान हाडुळे, प्रा. उज्वला बगदूरे, प्रा. युवराज शिखरे, प्रा. रहीम शेख, प्रा. राहुल मोरे, प्रा. कृष्णा पांचाळ, प्रा. दिपीका स्वामी, प्रा. पल्लवी माने, प्रा. माया जाधव व महसूल विभाग, लातूर येथील मतदान नोंदणी अधिकारी श्री जी. पी. दहिफ्फळे, श्री. नागेश मुळे इत्यादी शिबीर यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

२९) जागतिक एड्स दिनानिमित्त 'रेड रिबन' ची प्रकृती साकारत जनजागृती रॅलीचे आयोजन:

दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी जागतिक एड्स दिनानिमित्त शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यार्थी स्वयंसेवकांमार्फत 'रेड रिबन' ची प्रकृती साकारत एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली. 'संयम पाळा, एड्स टाळा', 'एड्स है एक जान लेवा बीमारी, इसे मिटाना जिम्मेदारी हमारी' अशा घोषणा देत ही रॅली काढत जनजागृती करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, यांनी एच.आय.व्ही. रोगाबाबत सावधानता बाळगणे आवश्यक आहे. असे मार्गदर्शन केले. यावेळी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, उपस्थित होते. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. स्वाती फेरे यांनी एचआयव्ही रोगाबाबत जनजागृती साठी व सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.





दिनांक १ डिसेंबर २०२२ रोजी 'जागतिक एड्स' दिनानिमित्त 'रेड रिबन' प्रतिकृती साकारत 'रैली' काढून जनजागृती करतांना उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

३०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६६ वे महापरिनिर्वाण दिनानिमित्त शाहू महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम

दिनांक ६ डिसेंबर २०२२ रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था संचालित राजर्षी शाहू महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६६ वे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी म्हटले की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने जनहिताच्या उत्कर्षाचा ध्यास घेणारे महामानव होते. त्यांनी संत तुकाराम महाराज, संत कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या विचाराने प्रेरित होऊन अस्पृश्य निवारण्यासाठी चे महत्तम कार्य तर केलेच, त्याचबरोबर समाजातील सर्वांगीण दृष्टीने वंचित असणाऱ्या, स्त्री, शेतकरी, मजूर, आलूते-बलुतेदार इ. सामान्य घटकांच्या उन्नतीसाठी कार्य केले. बाबासाहेबांनी केलेले कार्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केले तर त्यांना अभिवादन केल्याचे सार्थक होईल.''



'डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करतांना उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, डॉ. दीपक वेदपाठक, ग्रंथपाल डॉ.एस.बी.मस्के, कार्यालयीन अधीक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. पल्लवी नवगिरे व विद्यार्थी सम्यक कोल्हे यांनीही प्रातिनिधिक स्वरूपात मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी परीक्षा नियंत्रक डॉ. ओमप्रकाश शहापूरकर, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दीपक वेदपाठक, ग्रंथपाल प्रा. एस. बी. मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री पांडुरंग भोगिले, श्री निजाम शेख, कार्यालयीन अधीक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, प्रा. राजेंद्र शास्त्री, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इ. कर्मचारी व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सावंत यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले.

३१) वृक्षारोपण:

दिनांक २३ डिसेंबर २०२२ रोजी वेळ अमावस्या निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक विजय अशोक गवळी यांनी कोळपा येथील नांदेड रोड च्या कडेला श्री खराबे नागनाथ विश्वनाथ यांच्या शेतात 'चिंच' या झाडाच्या वृक्षारोपाची लागवड केली.

३२) शाहू महाविद्यालयात विद्यार्थ्यांना COVID -19 चा बूस्टर डोस:

दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी कोरोना व्हायरस पासून बचावात्मक सुरक्षा बाळगण्यासाठी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील विद्यार्थ्यांना COVID -19 चा बूस्टर डोस देण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, म.न.पा. लातूर येथील आरोग्य केंद्राचे कर्मचारी, महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इत्यादींनी सदर अभियान राबविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.



दिनांक २९ डिसेंबर २०२२ रोजी कोवीड १९ बूस्टर डोस कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी व मनपा लातूर चे आरोग्य कर्मचारी.

३३) पर्यावरण शिक्षण वह्यांमधील वृक्षारोप लागवडीचे फ्फोटो कात्रणे काढण्यासाठी स्वयंसेवकांचे योगदान:

दिनांक ३० डिसेंबर २०२२ शै. वर्ष २०२१-२२ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी 'पर्यावरण शिक्षण व जल सुरक्षा' या विषयातील प्रकल्प वही मध्ये 'एक विद्यार्थी, एक झाड' उपक्रमाचे जे फोटो लावले होते. ते फोटो वेगळे करण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर २०२२ रोजी कनिष्ठ महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५ विद्यार्थी स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या सूचनेनुसार सदर कार्यात योगदान दिले.

३४) सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'मुलगा हवा, पण मुलगी का नको ? विषयावर पथनाट्य सादरीकरण



दिनांक ३ जानेवारी २०२३ रोजी सावित्रीबाई फुले जयंती निमित्त पथनाट्य सादर करतांना रासेयो स्वयंसेवक व माहाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

दिनांक ०३ जानेवारी, २०२३ रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्था द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्त्री शिक्षणासाठी कार्य करणाऱ्या आद्य शिक्षिका व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी 'मुलगा हवा, पण मुलगी का नको ?' या विषयावर स्त्री भ्रूण हत्या व हुंडाबळी प्रथा रोखण्यासाठी जनजागृती पर पथनाट्य सादरीकरण केले. 'सावित्रीबाई फुले यांनी महात्मा फुले यांच्या नेतृत्वाखाली अनेक समस्यांना सामोरे जाऊन सुद्धा त्याकाळी महिलांना व मुर्लीना शिक्षण देत ज्ञानदानाचे कार्य केले'. असे विचार उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. 'टिफिन टाईम' चित्रपटाचे दिग्दर्शक म्हाल्साकांत कौसदीकर, निर्माते साहिल वास्टे, कलाकार विपुल साळुंखे, योगेश कुलकर्णी, सहाय्यक निर्देशक अजय शिंदे, कॉसमॉस अकॅडमीचे संचालक अजय मस्के यांनी

यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. व ६ जानेवारी रोजी प्रदर्शित होणा-या 'टिफिन टाईम' या मराठी चित्रपटाला पाहण्यासाठी विद्यार्थ्यांना आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, ग्रंथपाल, डॉ. एस.बी. मस्के, सहाय्यक ग्रंथपाल श्री. पांडुरंग भोगिले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

३५) राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबिरात विद्यार्थी स्वयंसेवक व कार्यक्रमाधिऱ्यांचा सहभाग:

दिनांक १० ते १२ जानेवारी २०२३ दरम्यान साने गुरुजी स्मारक माणगाव जिल्हा रायगड (माणगाव रेल्वे स्टेशन) येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे व शिक्षण उपसंचालक कार्यालय मुंबई यांच्या द्वारे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थी स्वयंसेवकांसाठी 'राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास शिबिर' आयोजित करण्यात आले. या राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबिरात राजर्षी शाहू महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक अनिकेत बालाजी गायकवाड, शितोळे सूर्यकिरण सिद्धेश्वर, पटेल रिजा इस्माईल या तीन स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकारी तसेच लातूर जिल्हा समन्वयक म्हणून प्रा. विजय अशोक गवळी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तत्पूर्वी दिनांक ०८ जानेवारी २०२३ रोजी रात्री ८:०० वा. लातूर येथुन रायगड कडे प्रस्थान केले व दिनांक ०९ जानेवारी रोजी शिबिराच्या पहिल्या दिवशी 'रायगड' किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या शिबिरात नेतृत्व गुण विकसित करण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले.

राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभाग (दि. ११ ते १७ जानेवारी २०२३)

युवा व खेल मंत्रालय नवी दिल्ली व कर्नाटक शासन यांच्या संयुक्त विद्यमाने धारवाड हुबळी येथे आयोजित राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये महाविद्यालयाचा स्वयंसेवक श्री. मयुर भिसे या विद्यार्थ्याची निवड होऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्रतिनिधीत्व करत श्री. मयुर भिसे यांनी या राष्ट्रीय युवा महोत्वसामध्ये उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

३६) राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन २०२३ साठी शाहू महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेविका कु.कदम निकिता हिचा सहभाग:

दिनांक १७ ते २६ जानेवारी, २०२३ या कालावधीत राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानगरी सांताक्रुज (पूर्व) मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचलन शिबिर व दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी शिवाजी पार्क मुंबई येथे प्रजासत्ताक दिन संचलनात राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थी स्वयंसेविका कु. कदम निकिता संजय हिने सक्रिय सहभाग नोंदविला. त्याबद्दल प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी तीचे अभिनंदन अभिनंदन केले.

३७) आझादी की मशाल रॅली चे शाहू महाविद्यालयात भव्य स्वागत दिनांक :

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने सर्व महाविद्यालयातून आझादी की मशाल रॅली हा कार्यक्रम हाती घेतला. सदर रॅली राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी दुपारी १:०० वाजता पोहचली. राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवकांनी व महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, रासेयो +२ स्तर चे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, यांनी रॅलीत सहभागी झालेल्या वेगवेगळ्या महाविद्यालयातील रासेयो कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांचे व आजादी च्या मशाल चे भव्य स्वागत केले.



दिनांक २४ जानेवारी २०२३ रोजी 'आजादी की मशाल रॅली' स्वागत कार्यक्रमात उपस्थित प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे, इतर प्राध्यापक, शिक्षक व रासेयो चे विद्यार्थी इ.

३८) प्रजासत्ताक दिनानिमित्त रोसेयो स्वयंसेवकांचे पथसंचलन:

दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रमानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकां द्वारे 'पथ संचलन' करण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश

रोडिया, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

३९) मौजे शिऊर गावात कार्यक्रमाधिकारी यांची शिबीर पूर्व तयारी साठी भेट:

दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील कार्यक्रमाधिकारी डॉ.कल्याण सावंत, डॉ.प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा.सोमदेव शिंदे यांनी मौजे शिऊर, ता.जि. लातूर या गावात जाऊन विशेष युवक शिबीर पूर्व तयारी करण्यासाठी भेट दिली व सदर गावातील सरपंच श्री सचिन सूर्यवंशी आणि गावातील नागरिकांशी संवाद साधत गावातील नागरिकांचा प्रतिसाद जाणून घेतला.

४०) शिवजयंती निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबीर संपन्न:

छत्रपति शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती व राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने येणा-या शिवजयंतीनिमित्त शनिवार दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी महाविद्यालयात भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. या रक्तदान शिबिराचे उदघाटन शि.छ.शि. संस्थेचे सदस्य डॉ. शेखर गरड व सौ सुरेखा गरड यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे हे होते. या भव्य रक्तदान शिबिरात १०४ रक्तपिशव्यांचे संकलन झाले. शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीला फक्त डीजे, डॉल्बीची रॅली न काढता शिवाजी महाराजांच्या कार्याचा प्रचार प्रसार होईल यासाठी भाषण व वक्तृत्व स्पर्धा रक्तदान शिबिरे आणि विभिन्न सामाजिक प्रबोधनासारखे उपक्रमांचे आयोजन केले जावे. अशा प्रकारचे आवाहन प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले.



दिनांक ११ फेब्रुवारी २०२३ रोजी शिव जयंती निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात उपस्थित रक्तदाते व शि.छ.शि.संस्थेचे सदस्य डॉ. शेखर गरड, शिव जन्मोत्सव समिती सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे व इतर मान्यवर

यावेळी डॉ. गणेश पन्हाळे, डॉ. हर्षवर्धन राऊत,ॲड. शिवकुमार जाधव, ॲड. भाई उदय गवारे, डी. एस. पाटील, प्रमोद साळुंके, भगवान माकणे, धनंजय शेळके, शहाजी पवार, अभिमन्यू जगदाळे, योगेश शिंदे, दत्ता मोटे, प्रतीक जाधव आदींची उपस्थिती होती.

सदर रक्तदान शिबीर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, डॉ. स्वाती फाफेरे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. प्रकाश रोडिया, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, माऊली ब्लड बँकेचे डॉ.सोनाली केंद्रे, पी.आर. ओ. बालाजी जाधव, संदीप ढोपरे, कल्पना कोंपले, बालाजी नरहरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

४१)(अ) शाहू महाविद्यालयाचे रासेयो च्या विशेष युवक शिबीराचे उद्घाटन:

दिनांक १३ फेब्रुवारी २०२३ लातूर प्रतिनिधी: 'भारताच्या विकासासाठी ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पाणी आडवा, पाणी जिरवा मोहिम द्वारा जलसंवर्धन, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, मुलगी वाचवा आणि मुलगी शिकवा, महिला उद्योग व सबलीकरण, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामस्वच्छता, बाल विवाह समस्या आणि प्रतिबंधात्मक उपाय, शेती, ग्रामोद्योग व शैक्षणिक विकास करण्यासाठी भारतत सरकार द्वारा आयोजित नऊ सूत्री शासकीय योजनांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक युवती गावा - गावात जाऊन लोकांसोबत संपर्क साधत वर्षभर विविध उपक्रम राबवत जनजागृती करतात. म्हणून राष्ट्र सेवेत एन.एन.एस. च्या स्वयंसेवकांचे अमूल्य योगदान आहे.' असे विचार जिल्हा परिषद लातूर चे मुख्य कार्यकारी श्री अभिनव गोयल यांनी युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास अभियानासाठी विशेष युवक श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले. शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर द्वारा संचालित राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे शिऊर ता.जि. लातूर येथे 'युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास' अभियानासाठी दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान विशेष युवक श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या उदघाटन समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष शि.छ.शि.संस्थेचे अध्यक्ष डॉ.गोपाळराव पाटील हे होते.

डॉ गोपाळराव पाटील यांनी मार्गदर्शन करताना म्हटले की, 'संतांनी व महापुरुषांनी जो कृतिशील मार्ग दाखविला त्याचा सर्वांनी अवलंब केला पाहिजे. गावाच्या विकासासाठी कुठल्याही कामाची लाज बाळगु नये. सुशिक्षित व चांगल्या व्यक्तिच्या संपर्कात राहूनच लोकांचे मतपरिवर्तन होते.' लोकमत वृत्तपत्राचे संपादक श्री धर्मराज हल्लाळे, मांजरा सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्रीशैल्य उटगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, गटविकास अधिकारी श्री

तुकाराम भालके आर्दीची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी ही शिबिरातील विद्यार्थी स्वयंसेवक व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. शिबिराच्या उदघाटनापूर्वी पूर्वी वृक्षारोपण जनजागृती दिंडी रॅली काढण्यात आली.

महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, सामाजिक कार्यविभागाचे प्रा. शुभम जाधव, शिऊर गावातील सरपंच प्रा. श्री. सचिन सूर्यवंशी, उपसरपंच श्री. विलास सूर्यवंशी, पोलीस पाटील श्री उद्धव पाटील, शालेय समितीचे अध्यक्ष श्री. सतिश सूर्यवंशी, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री. श्रीकांत शिरसाठ व मोठ्या संख्येने रोसेयो चे विद्यार्थी स्वयंसेवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश रोडिया व प्रा. विजय गवळी यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले.

दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान सुरू असलेल्या सात दिवसीय विशेष युवक समसंस्कार शिबिरा दरम्यान 'वृक्षारोपण व जनजागृती रॅली', 'ग्राम स्वच्छता व संत गाडगेबाबा आणि युवकांची भूमिका', ' अंधश्रद्धा निर्मूलन', 'पशु चिकित्सा शिबीर', 'लढा व्यसनमुक्तीचा', 'काव्य मैफिल', 'महिला मेळावा', 'बालविवाह समस्या आणि उपाय', 'पर्यावरण संवर्धन परिसंवाद', 'शेतकरी मेळावा', 'राष्ट्रीय एकात्मता व आजचा युवक', 'गजल गायन', 'आरोग्य शिबिर', 'सायबर सुरक्षा', 'सांस्कृतिक कार्यक्रम' , 'जलसंवर्धन', 'महिला सबलीकरण' अशा अनेक विषयांवर आधारित व्याख्यान, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत व शिऊर गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

शिबिराच्या समारोप समारंभाचे अध्यक्ष डॉ.पी.आर.देशमुख, प्रमुख पाहुणे म्हणून लातूर चे जिल्हाधिकारी मा. श्री बी.पी. पृथ्वीराज, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, लातूर विभाग राष्ट्रीय सेवा योजना + २ स्तर चे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

४२)(ब)शाहू महाविद्यालयातील रा.से.यो च्या विशेष युवक शिबीराचे समारोप संपन्न:

बालविवाह रोखण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रबोधन करावे.

- रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी (स्वा.रा.ती.म. विद्यापीठ नांदेड)

दिनांक १९ फेब्रुवारी २०२३ लातूर (प्रतिनिधी): महाराष्ट्र हा प्रगतशील व अनेक क्षेत्रांत पुढारलेला राज्य आहे पण तरीही बालविवाह च्या बाबतीत महाराष्ट्राचा नंबर सातव्या क्रमांकावर आहे. शिक्षणाच्या वयातच होणारे बालविवाह रोखण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी प्रबोधन करावे. असे आवाहन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथील रासेयो चे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी यांनी शिऊर येथे राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे आयोजित विशेष युवक शिबीराच्या समारोप समारंभाप्रसंगी व्यक्त केले. यावेळी समारोप समारंभाचे अध्यक्ष डॉ. पी.आर.देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महादेव गव्हाणे यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

शिवछत्रपती शिक्षण संस्था लातूर द्वारा संचलित राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'युवकांचा ध्यास, ग्राम-शहर विकास' अभियानासाठी दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान मौजे शिऊर, ता. जिल्हा लातूर येथे सात दिवसीय विशेष युवक श्रमसंस्कार शिबीर संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. तत्पूर्वी या शिबिराचे उद्घाटन वृक्षारोपण जनजागृती रॅली काढत जिल्हा परिषद लातूर चे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. अभिनव गोयल यांच्या हस्ते करण्यात आले. उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, प्रमुख पाहुणे म्हणून दैनिक लोकमत वृत्तपत्राचे संपादक श्री धर्मराज हल्लाळे हे होते.

दिनांक १३ ते १९ फेब्रुवारी २०२३ दरम्यान संपन्न झालेल्या सात दिवसीय विशेष युवक समसंस्कार शिबिरा दरम्यान डॉ.भीमराव पाटील यांनी 'ग्राम स्वच्छता व संत गाडगेबाबा आणि युवकांची भूमिका,' अनिस चे राज्य प्रधान सचिव श्री माधव बावगे यांनी' अंधश्रद्धा निर्मूलन कार्यशाळा' श्री दगडू लोमटे यांनी 'लढा व्यसनमुक्तीचा' डॉ.शुभदा लोहिया यांनी 'बालविवाह समस्या आणि उपाय' श्री सुपर्ण जगताप यांनी 'पर्यावरण संवर्धन परिसंवाद' सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक श्री सय्यद रहेमान व लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक श्री सोमय मुंडे यांनी 'राष्ट्रीय एकात्मता व आजचा युवक', न्यायाधीश श्रीमती अनुश्री गायकवाड यांनी 'महिला मेळावा' रेशीम विकास अधिकारी श्री एस.बी. वराट यांनी 'शेतकरी मेळावा' प्रा. मनोज बिराजदार यांनी 'सायबर सुरक्षा' या विषयांवर मार्गदर्शन केले. या शिबिरा दरम्यान घेण्यात आलेल्या आरोग्य शिबीरात ग्रामस्थांचे डोळे तपासणी, दंत तपासणी करत मोफत औषधोपचार करण्यात आले. या शिबिरात विद्यार्थी स्वयंसेवकांचे हिंदवी स्वराज्य, शिव प्रताप, गणिमी कावा, शिव शंभो, छावा, शिव छत्रपती असे सहा ग्रुप च्या माध्यमातून 'ग्रामस्वच्छता', 'बेटी बचाव, बेटी पढाव', 'काव्य मैफिल, 'गजल गायन', 'आरोग्य शिबिर', 'सांस्कृतिक कार्यक्रम' , 'पाणी आडवा, पाणी जिरवा

अभियानासाठी जलसंवर्धन उपक्रम', 'महिला सबलीकरण' या विषयांवर आधारित सांस्कृतिक, प्रबोधनात्मक व श्रमदान कार्यक्रम ही राबविण्यात आलेत. शिबिरात विद्यार्थी स्वयंसेवकांना राष्ट्रीय एकात्मता, सेवाभाव, संगठन, समय नियोजन, नेतृत्व विकास व व्यक्तिमत्त्व विकासाची शिकवन देण्यात आली.

सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी शिबिराचे संयोजक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा सदाशिव शिंदे, पर्यवेक्षक जयराज गंगणे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, शिऊर गावातील सरपंच प्रा. श्री सचिन सूर्यवंशी, उपसरपंच श्री विलास सूर्यवंशी, पोलीस पाटील श्री उद्धव पाटील, ग्रामसेवक सौ.आर.बी. भारती, शालेय समितीचे अध्यक्ष श्री सतिश सूर्यवंशी, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक श्री श्रीकांत शिरसाठ, ग्रामपंचायतीचे आणि सोसायटी चे सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

४३) राष्ट्रीय एकात्मता शिबीरामध्ये सहभाग:

दि. २३ फेब्रुवारी ते १४ मार्च दरम्यान युवा व खेल मंत्रालय भारत सरकार व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे राष्ट्रीय एकात्मता शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरामध्ये महाविद्यालयाचा स्वयंसेवक श्री महेश कलमे याची निवड होऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करत उत्स्फुर्त सहभाग नोंदवला.

४४) वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभात उत्कृष्ट स्वयंसेवकांचा गौरव:

दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस वितरण समारंभात वर्षे २०२२-२३ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेत नियमित कार्यक्रमात व विशेष युवक शिबिरात उत्कृष्ट कामगिरी करणा-या कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन स्वयंसेवकांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय सेवा योजना चा स्वयंसेवक शेख अमीर, व कुकडे ऋतुराजे यांना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते ५००-५०० रुपये बक्षीस वितरण करण्यात आले.

४५) शाह्रूत पाच दिवसीय 'लातूर जिल्हास्तरीय युवक-युवती नेतृत्व विकास शिबीर' संपन्न:

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत पाच दिवसीय 'लातूर जिल्हास्तरीय युवक - युवती नेतृत्व विकास शिबीर' महाविद्यालयात संपन्न झाले. या शिबिराचे उदघाटन लातूर वृक्ष समन्वय



दिनांक २७ मार्च २०२३ रोजी 'जिल्हास्तरीय युवक युवती नेतृत्व विकास शिबीर उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करतांना श्री सुपर्ण जगताप, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे व मंचावर उपस्थित उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे व समोर रासेयो चे विद्यार्थी इ.

समिती चे समन्वयक श्री सुपर्ण जगताप यांनी केले. शिबिरात डॉ. भीमराव पाटील यांनी 'व्यक्तिमत्व विकासातील पैलू', सेवा निवृत्त पोलीस निरीक्षक श्री सय्यद रेहमान यांनी 'स्त्री-पुरुष समानता काळाची गरज', श्री सुपर्ण जगताप यांनी 'पर्यावरण संवर्धन समस्या व उपाय', प्रा. मंजुषा शिंदे यांनी 'सायबर क्राईम', डॉ. सदाशिव दंदे यांनी 'आत्मनिर्भर भारत आणि युवक', डॉ. मच्छिंद्र खंडागळे यांनी 'धर्मनिरपेक्ष भारत', डॉ. धनंजय गुट्टे यांनी 'वैज्ञानिक दृष्टिकोन', डॉ. दीपक वेदपाठक यांनी 'भारतातील ललित कला व सांस्कृतिक वारसा', आशा अनेक मान्यवरांनी सदर वेगवेगळ्या विषयांवर आपल्या व्याख्यानातून उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. तर राजर्षी शाहू महाराज जन्म शताब्दी वर्षानिमित्त 'जलसंवर्धन' या विषयावर विद्यार्थी परीसंवादात मार्गदर्शन केले. या पाच दिवसीय शिबिरात दररोज सकाळी योगसत्र घेण्यात आले. व संध्याकाळी 'व्यक्तिमत्त्व विकास व नेतृत्व विकास संदर्भात काही गटचर्चा खेळांचे' आयोजन करण्यात आले. शिबिरात लातूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील व राजर्षी शाहू कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातून एकूण १०० स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. शिबिराच्या समारोप समारंभात दयानंद महाविद्यालयातील संगीत विभागाचे प्राध्यापक व लातूर विभागातील राष्ट्रीय सेवा योजना चे विभागीय समन्वयक डॉ. संदीप जगदाळे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या समारोप समारंभात शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर चे सहसचिव मा. गोपाळ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराच्या उद्घाटन व समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी मार्गदर्शन केले.

या शिबिराला यशस्वी रित्या संपन्न करण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व शिबीर संयोजक लातूर

जिल्ह्यातील रासेयो समन्वयक डॉ. कल्याण सावंत, कार्यक्रमाधिकारी डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. प्रकाश रोडिया, रासेयो चे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय अशोक गवळी, प्रा. सोमदेव शिंदे इतर प्राध्यापक अमोल लांडगे, डॉ. शिवराज काचे, प्रा. शुभम जाधव, प्रा. पुजा मस्के पाटील, इत्यादींनी विशेष परिश्रम घेतले.



दिनांक २१ मार्च २०२३ रोजी 'जिल्हास्तरीय युवक युवती नेतृत्व विकास शिबीर समारोप समारंभात मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप जगदाळे, मंचावर उपस्थित शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सदस्य श्री गोपाळ शिंदे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, प्रा. विजय गवळी इ.



आव्हान २०२२ येथील उत्कृष्ठ संघ म्हणून पारितोषिक पटकाविलेले लातूर जिल्ह्यातील संघातील महाविद्यालयाचे सहभागी झालेले स्वयंसेवक.



प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी राष्ट्रीय सेवा योजनेचे प्लाटून



दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त पथसंचलन कलेले रासेयो चे स्वयंसेवक व शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, , सदस्य श्री बब्रुवान गोमसाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. विजय गवळी व इतर.

IIT-JAM

In order to promote science as a career choice for talented students nationwide, the Joint Admission Test for Masters (JAM) is a qualifying exam for admissions to M.Sc. (Two-Year), Joint M.Sc.-Ph.D., M.Sc.-Ph.D. Dual Degree, and other Post-Bachelor's Degree Programmes at various IITs. In light of this, our college principal, honourable Dr.Mahadev Gavhane, took the initiative to establish an IIT-JAM CELL within the institution, designating Dr. Nishank Pimple as its coordinator.

The primary goal of IIT-JAM cell is to raise awareness of the IIT-JAM test and inspire UG final year students to pursue their studies at reputed IITs, NITs, and centrally supported institutions for M.Sc., M.Sc. integrated Ph.D., and Ph.D.

A "One Day IIT-JAM Examination 2023 Awareness Workshop" was arranged for third-year undergraduate students on September 11, 2022. Principal Dr.Mahadev Gavhane stated during this session that students may access as many books as they like to prepare for the IIT-JAM test, and there is a dedicated study area available for these aspirants 24 hours a day. Department-specific schedules for counselling and doubt-clearing have been established for these candidates. Forty students in all enrolled for this exam. Coordinator Dr. Nishank Pimple instructed all non-mathematics IIT JAM aspirants in subjects like chemistry, physics, and biotechnology on the fundamentals of mathematics using an offline approach. A rigorous Six MOCK TEST series of four papers is intended to lessen the stress of the final test. Following two test days, the results of each MOCK test series were announced, and the top scorers received rewards to encourage them. Students have selected a number of examination centres including Nanded, Solapur, and Pune. Before the IIT-JAM 2023 test, Hon. Vice Principal Prof. S.N. Shinde encouraged students and wished them well. Eventually, Coordinator Dr. Nishank Pimple took over the duty of taking IIT-JAM candidates to Solpaur for their examination.As an outcome of all these activities four students got qualified in IIT-JAM 2023 examination. It is also noticed that, the interest of B.Sc. III year students towards preparation and appearing the IIT-JAM Examination is found to be increased after establishment and activities of IIT-JAM Cell.

Chemistry and Physics



Bajarang Karad
IIT- JAM AIR-439 (CY)



Sumit Kadam
IIT- JAM AIR-1835 (CY)



Pritam Barure
IIT- JAM AIR-2612 (CY)



Charudatta Tikte
IIT- JAM AIR-6528 (PH)

3 students qualified GATE 2023 examination in Life Sciences and Chemistry.



Aditya Kadam
GATE - 2023
AIR-2073 (XL)



Gokul Sirsat
GATE - 2023
AIR-2670 (XL)



Gokul Sirsat
GATE - 2023
AIR-7452 (CY)

All these IIT-JAM and GATE qualifiers are felicitated byPrincipal Mahadev Gavhane, Vice Principal Prof. S. N. Shinde, IIT-JAM Coordinator,Dr.Nishank Pimple, and other faculty members.



Felicitation of IIT-JAM – 2023 &
GATE - 2023 Qualifiers



महाविद्यालयाच्या प्रदिर्घ सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रमात सत्कार करताना शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव, प्राचार्य अनिरूध्द जाधव.



मा.आ.श्री बाबासाहेब पाटील यांनी महाविद्यालयास सदिच्छा भेट देवून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांचे कडून महाविद्यालयाची प्रगती आणि कार्यप्रणाली जाणून घेतली.



महाविद्यालयातील गुणवंत कर्मचाऱ्यांना **'शाहूभूषण'** पुरस्कार प्रदान करताना शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील, उपाध्यक्ष डॉ. पी. आर. देशमुख, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे व इतर मान्यवर.



स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड द्वारा आयोजित युवक महोत्सवात पारितोषीक प्राप्त सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांचा सत्कार करतान महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रभारी प्राध्यापक, मार्गदर्शक व विद्यार्थी.



उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पूणे **डॉ. धनराज माने** यांनी पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ-२०२३ चे प्रमुख पाहूणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



राष्ट्रीय सेवा योजना विषयांतर्गत आयोजित 'वृक्षारोपण व पर्यावरण संवर्धन : काळाची गरज' या कार्यक्रमात विधान परिषदेचे मा. आ. पाशाभाई पटेल यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. महादेव गव्हाण, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे आणि माजी विद्यार्थी अच्युत गंगणे.



विद्यापरीषद बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना मा. कुलगुरू डॉ. बी.ए. चोपडे, सोबत संस्था संचालक मा. प्राचार्य डॉ. रावसाहेब कावळे, प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे व उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे



मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार श्री विक्रम काळे यांनी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.डॉ. गोपाळराव पाटील यांची सदिच्छा भेट घेवून संवाद साधला.

PARVATI/9923221000